



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १५१ * नांदेड * रविवार, दि. ७ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## नांदेडमध्ये वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस

○ शहरात विजांचा कडकडाट
○ उकाड्यापासून नांदेडकरांना दिलासा



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर आणि परिसरात रविवार, दि. ७ जून रोजी अचानक हवामानात मोठा बदल झाला. दुपारच्या सुमारास आलेल्या वादळीवाऱ्यासह आणि विजांच्या जोरदार कडकडाटात पावसाने हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून उकाड्याचा सामना करणाऱ्या नांदेडकरांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असून संपूर्ण परिसरात काहीसा गारवा निर्माण झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढलेला होता. नागरिक उन्हाच्या तीव्र झळा आणि घामाच्या धारांनी हैराण झाले होते. मात्र, आज दुपारनंतर अचानक आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि पाहता पाहता सोसाट्याचा वारा सुटला. वादळीवाऱ्याचा वेग इतका जास्त होता की त्यामुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्या, तर काही भागांतील तात्पुरते शेड आणि होर्डिंग्सला फटका बसला.

विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. रस्त्यांवरून पाण्याचे पाट वाहू लागले होते. पहिल्याच जोरदार पावसामुळे शहरातील सखल भागांत पाणी साचल्याचे पाहायला मिळाले. अचानक आलेल्या या पावसामुळे रस्त्यावरील वाहनधारकांची आणि पादचाऱ्यांची एकच तारांबळ उडाली. गेल्या अनेक दिवसांपासून वाढलेल्या तापमानाला अचानक ब्रेक लागला. वातावरणातील उष्णता कमी होऊन हवेत गारवा निर्माण झाला आहे. नागरिकांनी घरात एसी, पंखे बंद करून या आल्हाददायक हवामानाचा आनंद घेतला.

**शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

मृग नक्षत्र सुरू होताच पावसाने अशी दमदार एन्ट्री केल्यामुळे खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत व्यस्त असलेल्या बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. हा पाऊस शेतीकामांसाठी अत्यंत पूरक मानला जात असून, जिल्ह्यात लवकरच पेरण्यांना वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तथापी, वादळी वाऱ्यामुळे खबरदारी म्हणून प्रशासनाने नागरिकांना विजा चमकत असताना झाडांखाली किंवा खुल्या मैदानात न थांबण्याचे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्रात मान्सूनचा कहर; १९ राज्यांना अलर्ट



**मुंबई (प्रतिनिधी)–** उकाड्याने हैराण झालेले देशभरातील नागरिक पावसाची वाट पाहत आहेत. मान्सून केरळमध्ये दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात वेळेमध्ये दाखल झाला. मान्सून दाखल होताच हवामान खात्याने देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्याचा इशारा दिला आहे. पुढचे ४८ तास महत्वाचे असणार आहे. ११ राज्यांमध्ये वादळ वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

दिल्ली-एनसीआरपासून उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतापर्यंत पाऊसाचा जोर पाहायला मिळेल. अनेक ठिकाणी ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात ज्यामुळे जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मान्सून दाखल झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मान्सून हळूहळू पुढे सरकरत असून लवकरच तो मुंबईत पोहचेल अशी माहिती हवामान खात्याने दिली आहे.

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत मान्सून वेगाने पुढे सरकेल आणि अनेक राज्यांमध्ये पसरेल. अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत हवामान प्रणाली सक्रिय झाल्या आहेत. ज्यांचा उत्तर, पूर्व आणि दक्षिण भारतावर थेट परिणाम होईल. सध्या देशाच्या विविध भागांमध्ये चक्रीवादळ सक्रिय झाले आहे. त्यामुळे हवामान अत्यंत अस्थिर झाले आहे. काही ठिकाणी कडक उन्हापाठोपाठ अचानक पाऊस येतो तर इतर ठिकाणी वादळे आणि मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे.

पुढच्या दोन ते तीन दिवसांत मान्सून हळूहळू पुढे सरकण्याची शक्यता आहे. त्यानंतर तो छत्तीसगड, ओडिशा, उप हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये पोहोचू शकतो. अनेक भागांमध्ये वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे झाडे उन्मळून पडण्याचा आणि वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका वाढण्याची शक्यता आहे. पावसाचा अंदाज लक्षात घेता नागरिकानी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## राममंदिराच्या तिजोरीतून रक्कम गायब झाल्याचा आरोप

**लखनौ (वृत्तसंस्था) –** अयोध्येतील राममंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी मंदिराच्या देणगी रकमेवरून वाद निर्माण झाला आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी कोट्यवधी रुपयांची देणगी रक्कम गायब झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वातावरण तापले असून विविध चर्चांना उधाण आले आहे.

अखिलेश यादव यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत यासंदर्भात दावा केला आहे. राममंदिरात जमा झालेल्या देणगीतील कोट्यवधी रुपयांची रक्कम गायब झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच याप्रकरणी न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या मुद्द्यावर सरकार आणि संबंधित ट्रस्टकडून स्पष्ट भूमिका समोर येत नसल्याने संशय निर्माण होत असल्याचेही त्यांनी या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

समाजवादी पक्षानेही या प्रकरणात पारदर्शकतेची मागणी केली आहे. मंदिरासाठी आतापर्यंत किती निधी जमा झाला, तो कोणत्या कामांसाठी खर्च करण्यात आला आणि शिल्लक रकमेचा तपशील काय आहे, याची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी पक्षाकडून करण्यात आली आहे. भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा हिशेब जनतेसमोर मांडणे आवश्यक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे..

## पेपरमध्ये वडापाव, समोसे दिल्यास कडक कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी)–** अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेतल्यापासून भेसळखोर आणि साठेबाजांना सळो की पळो करुन सोडणारे डॅशिंग सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची वक्रदृष्टी आता वडापाव आणि समोसा विक्रेत्यांकडे वळली आहे. बाजारपेठेत मिळणाऱ्या वडापाव आणि समोसा ग्राहकांना बांधून देण्यासाठी सर्रासपणे वर्तमानपत्रांच्या कागदाचा वापर होतो. मात्र, यापुढे वडापाव, समोसा आणि तत्सम खाद्यपदार्थ वर्तमानपत्रांच्या कागदात गुंडाळून विकता येणार नाहीत, असा आदेश अन्न व औषध प्रशासन विभागाने दिला आहे.

तुकाराम मुंढे यांची प्रतिमा आणि कठोर शिस्त पाहता इतर सरकारी निर्णयांप्रमाणे या आदेशात सेटलमेंट होण्याची शक्यता फार कमी आहे. त्यामुळे आता समोसा आणि वडापाव विकणाऱ्यांना लवकरात लवकर वर्तमानपत्राच्या कागदाला पर्याय शोधावा लागणार आहे. तसे न केल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई अटळ मानली जात आहे. तुकाराम मुंढे यांनी चार्ज घेतल्यापासून अन्न व औषध विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून भेसळीचा माल जप्त केला आहे. संबंधित विक्रेत्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. त्यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा वडापाव आणि समोसा विक्रेत्यांकडे वळवला आहे.

वर्तमानपत्रात -खाद्यपदार्थ विकणारे विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) रडारवर आले आहेत. खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, अशी सक्त ताकीद अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी विभागामार्फत सर्व विक्रेत्यांना जारी केल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पनीर विक्रेते, औषध विक्रेते, गुटखा आणि पानमसाला विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या विरोधात कारवाई करीत असताना अनेक ठिकाणी वर्तमानपत्रामध्ये गुंडाळून खाद्यपदार्थ खासकरून वडापाव-भजीपाव दिले जात असल्याचे तुकाराम मुंढे यांच्या लक्षात आले. वास्तविक वर्तमानपत्रात गुंडाळून खाद्यपदार्थ विकण्यास पूर्वीपासून बंदी आहे.

वर्तमानपत्रांच्या छपाईच्या शाईमधील शिसे, झिंक, कॅडमियन मानवी आरोग्यास घातक असल्याने वडापावसारखे पदार्थ वर्तमानपत्रात बांधून देऊ नयेत, अशा मागणीच्या ठरावाची सूचना शिवसेनेचे तत्कालीन नगरसेवक आशीष चेंबूरकर यांनी पालिकेच्या महासभेत मांडली होती. ती मंजूरही झाली होती.

वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ विकण्यास बंदी केल्यामुळे आता खाद्यपदार्थ खासकरून वडापाव, भजीपाव, समोसे, सॅण्डवीच यांच्यासारखे अन्य खाद्यपदार्थ बांधण्यासाठी अलीकडच्या काळात बटर पेपरचा वापर होतो. हे खाद्यपदार्थ बटर (पान ६ वर...)

## गॅसच्या दरात मोठी वाढ

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यात पुन्हा एकदा महागाईचा भडका उडाला आहे. सरकारनं गेल्या तीन महिन्यांत घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात दुसऱ्यांदा वाढ केली आहे. एकीकडे इंधन दरवाढ आणि दुसरीकडे सिलेंडरही महाग झाल्याने सर्वसामान्यांचं बजेट कोलमडलंय. गॅस दरवाढीचे राजकीय पडसादही उमटले.

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागली आहे. आधीच पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे होरपळणाऱ्या जनतेला आता घरगुती गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. तेल कंपन्यांनी घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात थेट २९ रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यात महागाईची झळ आणखी तीव्र होणार आहे. विशेष म्हणजे, गेल्या तीन महिन्यांत तेल कंपन्यांकडून एकूण ८९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तेल कंपन्यांनी याआधी ७ मार्च २०२६ मध्ये प्रति सिलिंडर ६० रुपयांची वाढ होऊन ९१२.५० रुपये झाले. त्यानंतर आता ७ जूनला घरगुती सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ होऊन ९४१.५० रुपये किंमत झाली आहे.

अवघ्या तीन महिन्यांत घरगुती गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचं बजेट कोलमडलंय. तेल कंपन्यांच्या दरवाढीविरोधात राज्यभरातील गृहिणींनी तीव्र संताप व्यक्त केलाय. वाढत्या गॅस दरवाढीवरून विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे. सत्ताधाऱ्यांना महागाईची किंमत मोजावी लागेल, असा थेट इशारा विरोधकांनी दिला आहे. तर जगात युद्धामुळे इंधनाचे दर वाढल्याचं सांगत मुख्यमंत्र्यांनी सारवासारव केली आहे.

घरगुती गॅसच्या किंमतीत वाढ झाल्यानं आता सर्वसामान्यांचं बजेट कोलमडण्याची शक्यता आहे. जागतिक परिस्थिती आणि कच्च्या तेलाच्या किमती स्थिर असतानाही देशातील कंपन्या तोटा भरून काढण्यासाठी वारंवार इंधनांच्या किंमतीत वाढ करत आहेत. त्यामुळे 'अच्छे दिन' येण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्यांच्या ताटातील (पान ६ वर...)

## पुण्याजवळच्या हाय-प्रोफाईल पार्टीवर पहाटे पोलिसांची धाड

गांजा, हुक्का अन् ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरू असलेल्या एका अनधिकृत पार्टीवर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई केली आहे. या कारवाईत मद्यसाठा, बंदी घातलेले हुक्का फ्लेवर्स आणि गांजा असा सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त गौहर हसन यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुळापूर येथे अनधिकृत पार्टी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ७ जून रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास पुणे पोलीस दलातील १५ अधिकारी आणि ६५ पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. या पार्टीत एकूण १५६ जण उपस्थित होते. यामध्ये १०७ पुरुष आणि ४९ महिलांचा समावेश होता.

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन थांबणार नाही -अभिजित दीपकेंचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून नीट परीक्षेच्या घोळामुळे १ कोटीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. नैराश्यातून विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. जोपर्यंत देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आपल्या पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही. आम्ही त्यांचा राजीनामा घेऊनच राहू, असा आक्रमक पवित्रा कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजित दिपके यांनी छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत व्यक्त केला. जर येत्या ६ दिवसांत शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

दीपके म्हणाले, जर देशाचे पंतप्रधान रशिया आणि युक्रेनचे युद्ध थांबवू शकतात, तर ते देशातील पेपर लीक का थांबू शकत नाहीत? या सर्व प्रकरणाची जबाबदारी कुठेतरी निश्चित झाली पाहिजे. सिस्टीम तेव्हाच फिक्स होईल जेव्हा कोणीतरी याची जबाबदारी स्वीकारेल.

मी कालच अमेरिकेतून भारतात आलो आणि थेट जंतर-मंतरला गेलो. तेथील जागा अपुरी पडेल एवढी गर्दी तरुणांची होती. ज्यांना संशय आहे त्यांनी तिथले फोटो पाहावेत. तुम्ही देशाचे वाटोळे करून टाकले आहे. मुलांना रोजगार नाही, परीक्षा नीट घेतल्या जात नाहीत. पण आता या देशातील तरुण सरकारला घाबरणार नाही, तो (पान ६ वर...)



**नांदेड–** शहर आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. यावेळी विजांच्या कडकडाटासह वादळी वारेही सुसाट वेगाने वाहत होते. याचा फटका महापारेषण व महावितरणच्या वीज पुरवठा करणाऱ्या खांबांनाही बसला. निळा ते मरळक रस्त्यावर हा खांब कोसळून वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे या भागातील अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित झाला आहे.






## सुनेत्रा पवारांच्या रिक्त जागी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांना संधी

**मुंबई (प्रतिनिधी) –** सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांना संधी मिळाली आहे. सुनील तटकरे यांनी घोषणा केली आहे. राजेंद्र जैन हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांचे निकटवर्तीय आहेत. त्यांच्या नावाची घोषणा करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीपूर्वी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची बैठक पार पडली. मंत्री छगन भुजबळ यांच्या सातपुडा निवासस्थानी दिलीप वळसे पाटील, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दिल्ली हायकमांडकडून आलेल्या निरोपाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.



जैन हे राष्ट्रवादी काँग्रेसचे एक निष्ठावान नेते असून, पक्षाचे विदर्भातील महत्त्वाचे संघटक मानले जातात. प्रफुल पटेल यांचे निकटवर्तीय असून त्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये पक्षाचे निरीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. यापूर्वी, ते विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून आले होते. तर, गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्यांमध्ये ते महत्त्वाचे नेते मानले जातात. नुकत्याच झालेल्या राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकीच्या वेळीही त्यांच्या नावाची पक्षाच्या कोअर कमिटीत प्रबळ दावेदार म्हणून चर्चा झाली होती.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, यावरून जोरदार चर्चा रंगली होती. या जागेवर भाजप नेत्या नवनीत राणा यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी दिली जाणार अशी जोरदार चर्चा रंगली होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही चर्चा पूर्णपणे फेटाळून लावत नवनीत राणा हा विषय राष्ट्रवादीकडून संपला आहे, असे स्पष्ट केले होते. रोहित पवार यांनी केलेल्या टीकेलाही त्यांनी प्रत्युत्तर दिलं होतं.

दरम्यान, या सर्व घडामोडींवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार गटावर निशाणा साधला होता. रोहित पवार म्हणाले होते की, या जागेवरून छगन भुजबळ यांना संधी दिली पाहिजे. भाजप विचाराधीन किंवा भाजपच्या व्यक्तीला सुनेत्रा पवारांची जागा आहे, ती दिली गेली तर पूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपच्या चरणी गेला असं म्हणावं लागेल, किंवा तो दिल्लीसमोर झुकलेला आहे, असा संदेश जाईल. रोहित पवारांच्या (पान ६ वर...)

## चुकीचा तपास करणाऱ्या दोन पोलीस निरीक्षकांचे निलंबन



**बुलढाणा (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील राजूर येथील बहुचर्चित हत्याकांड प्रकरणाच्या तपासात हलगर्जीपणा आणि गंभीर चूक करणे पोलीस विभागातील बड्या अधिकाऱ्यांना चांगलेच भोवले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत अमरावती विभागाचे पोलीस महानिरीक्षक यांनी तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर आणि जळगाव जामोदचे पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. या मोठ्या कारवाईमुळे पोलीस वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपूर्वी जळगाव जामोद पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात मुलीचा मृतदेह आढळून आला होता. पोलिसांनी घाईघाईने तपास करत ही मृत मुलगी शिवानी नावाची असल्याचा निष्कर्ष काढला. इतकेच नव्हे तर, ती जिवंत असतानाही तिला मृत जाहीर करून, तिच्या हत्येच्या आरोपाखाली तिच्या निष्पाप वडील आणि भावाला अटक केली होती.

पोलिसांनी ज्या मुलीला मृत समजून तिच्या कुटुंबीयांना जेलमध्ये पाठवले, ती शिवानी प्रत्यक्षात जिवंत असल्याचे समोर आले. यामुळे पोलीस प्रशासनाची राज्यभरात मोठी नाचक्की झाली होती. दरम्यान पोलिसांना मिळालेला तो मृतदेह नेमका कोणाचा होता? आणि त्या मृत मुलीची ओळख काय? याचा उलगडा अद्यापही झालेला नाही.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ट्रम्प : लबाड लांडगं ढोंग करतय!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा भारत–अमेरिका व्यापार कराराबाबत आशावादी वक्तव्य करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे चांगले मित्र असल्याचे सांगत त्यांनी द्विपक्षीय व्यापार करार निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त केला. परंतु ट्रम्प यांच्या अशा विधानांकडे आता जग गंभीरतेने पाहत नाही, ही वस्तुस्थिती आहे. कारण ट्रम्प यांच्या राजकारणाची ओळखच सातत्यहीनता, परस्परविरोधी विधाने आणि क्षणोक्षणी बदलणारी भूमिका अशी बनली आहे. एका बाजूला ते भारताशी मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे सांगतात, तर दुसऱ्या बाजूला भारताने अनेक वर्षे अमेरिकेचा फायदा घेतला आणि अमेरिकन कंपन्यांवर मोठे शुल्क लादले, अशी टीका करतात. हे केवळ भारताबाबतच नाही; ट्रम्प यांची चीन, रशिया, युरोप, नाटो, स्थलांतर, हवामान बदल किंवा युक्रेन युद्धाबाबतची भूमिका देखील वारंवार बदलत राहिली आहे. त्यामुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील स्थैर्यच धोक्यात आले आहे. जगातील महासत्ता म्हणून अमेरिकेकडे पूर्वी स्थिर, परिपक्व आणि दीर्घकालीन धोरणे असलेल्या राष्ट्राच्या नजरेतून पाहिले जात होते. परंतु ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका अनेकदा व्यक्तिकेंद्री, भावनिक आणि तात्कालिक राजकारण करताना दिसली. अमेरिका फर्स्टचा नारा देताना त्यांनी अनेक पारंपरिक मित्र राष्ट्रांना दूर लोटले. त्याच वेळी रशियाबाबत कधी मवाळ तर कधी आक्रमक भूमिका घेतली. युक्रेनला मदत देण्याबाबत रिपब्लिकन पक्षातच मतभेद निर्माण झाले. अमेरिकन काँग्रेसने युक्रेनला अब्जावधी डॉलरची मदत मंजूर केली असली, तरी ट्रम्प समर्थक गट या निर्णयाविरोधात उभा राहिला. यामुळे अमेरिकेच्या जागतिक नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ट्रम्प यांची सर्वात मोठी अडचण म्हणजे विश्वासार्हतेचा अभाव. निवडणूक प्रचारात दिलेली अनेक आश्वासने पूर्ण झाली नाहीत. मेक्सिको सीमाभिंत, रोजगारनिर्मिती, महागाई नियंत्रण, चीनविरोधी व्यापारयुद्ध किंवा स्थलांतर नियंत्रण यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने भूमिका बदलल्या. परिणामी अमेरिकेतील सर्वसामान्य नागरिकांमध्येही संभ्रम निर्माण झाला आहे. आज अमेरिकेची अर्थव्यवस्था देखील गंभीर आव्हानांना सामोरी जात आहे. वाढती महागाई, बेरोजगारीची भीती, कर्जाचा बोजा आणि मंदीचे सावट यामुळे अमेरिकन जनतेचा सरकारवरील विश्वास डळमळीत झाला आहे. सिलेक्ट यूएसएसारख्या गुंतवणूक कार्यक्रमांद्वारे रोजगारनिर्मितीचे प्रयत्न होत असले, तरी प्रत्यक्षात उद्योगविश्व अजूनही अनिश्चिततेच्या वातावरणात आहे. ट्रम्प यांच्या आक्रमक व्यापार धोरणांमुळे अनेक उद्योगांवर परिणाम झाला. चीनबरोबरच्या व्यापारयुद्धाचा फटका अमेरिकन ग्राहक आणि कंपन्यांनाही बसला. त्याचप्रमाणे अमेरिकेतील इजराइल समर्थक उद्योजकांनी ट्रम्प यांना थेट इशारा दिला आहे की त्यांनी जर युद्ध थांबवले नाही तर त्याचे आर्थिक परिणाम भोगावे लागतील. राजकीय स्थैर्याचा अभाव हा अमेरिकेसाठी अधिक चिंतेचा विषय ठरत आहे. अमेरिकन सिनेटमध्ये स्थलांतर विधेयक मंजूर झाले असले, तरी त्याभोवती निर्माण झालेला संघर्ष देशातील वाढत्या ध्रुवीकरणाचे प्रतीक आहे. ट्रम्प यांच्या राजकारणाने अमेरिकन समाजात विभाजन अधिक तीव्र केले. स्थलांतरितांविरोधातील कठोर भूमिका, माध्यमांवर हल्ले, न्यायव्यवस्थेवर टीका आणि विरोधकांविरोधातील आक्रमक भाषा यामुळे लोकशाही संस्थांबद्दलचा आदर कमी होत गेला. एकेकाळी जगाला लोकशाहीचे धडे देणाऱ्या अमेरिकेची प्रतिमा आज अंतर्गत संघर्ष, अस्थिर नेतृत्व आणि आर्थिक अनिश्चितता यामुळे मलीन झाली आहे. ट्रम्प यांच्या विधानांमध्ये सातत्य नसल्याने त्यांच्या मित्र राष्ट्रांनाही सावध भूमिका घ्यावी लागत आहे. त्यामुळेच आज ट्रम्प काहीही बोलले तरी त्यावर त्वरित विश्वास ठेवण्यास कोणी तयार दिसत नाही. भारतासाठीही ही परिस्थिती समजून घेणे महत्त्वाचे आहे. अमेरिका ही भारताची महत्त्वाची आर्थिक आणि सामरिक भागीदार असली, तरी कोणत्याही एका नेत्याच्या वैयक्तिक संबंधांवर परराष्ट्र धोरण उभे राहत नाही. जागतिक राजकारणात स्थिरता, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन धोरणे अधिक महत्त्वाची असतात. ट्रम्प यांच्या नेतृत्वाने नेमके याच मूल्यांना धक्का दिला आहे. ट्रम्प हे प्रधानमंत्री मोदी यांच्यावर वारंवार दबाव आणून भारताने रशिया सोबतचे आर्थिक व्यवहार तोडावेत असे सांगत आहेत. हे देखील अनैतिकच आहे परंतु एवढी समज ट्रम्प यांच्याकडे नाही. त्यांचे बौद्धिक दारिद्र्य आता उघड झाले आहे. अमेरिका अजूनही जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्रांपैकी एक आहे; परंतु महासत्ता टिकवण्यासाठी केवळ आर्थिक किंवा लष्करी ताकद पुरेशी नसते. त्यासाठी नेतृत्वावर विश्वास असणे आवश्यक असते आणि नेमका तोच विश्वास आज डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाबतीत ढासळलेला दिसतो. ही अमेरिकेच्या विनाशाची पायाभरणी तर नव्हे ना! ट्रम्प यांच्या ताज्या विधानावरून आणि आतापर्यंतच्या त्यांच्या अस्थिर बुद्धिमत्तेवरून त्यांचं भारताबाबतच विधान हे लबाड लांडगं ढोंग करतय, यापेक्षा वेगळं नाही.

# जीवलग मैत्री : आयुष्याचा खरा आधार

मानवी जीवन हे नातेसंबंधांच्या आधारावर उभे असलेले एक सुंदर विश्व आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत माणूस विविध नात्यांशी जोडला जातो. काही नाती जन्मतः मिळतात, काही सामाजिक रचनेतून निर्माण होतात, तर काही नाती मनाच्या गाभाऱ्यातून जन्म घेतात. या सर्व नात्यांमध्ये मैत्री हे नाते अत्यंत अनोखे, निस्वार्थ आणि जीवनाला अर्थ देणारे मानले जाते. आई-वडील, भाऊ-बहीण, नातेवाईक यांची नाती आपल्याला आपोआप मिळतात; परंतु मित्र आणि मैत्रीण ही अशी व्यक्ती असते जी आपण स्वतः निवडतो आणि जी आपल्याला मनापासून स्वीकारते. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर सुख-दुःखात, यश-अपयशात, संघर्ष आणि आनंदाच्या क्षणांमध्ये खंबीरपणे साथ देणारी व्यक्ती म्हणजे जिवलग मित्र किंवा जिवलग मैत्रीण. अशा या अनमोल नात्याचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ८ जून रोजी 'राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा सामाजिक माध्यमांवर संदेश पाठविण्याचा नसून, आपल्या जीवनात विशेष स्थान असलेल्या मित्र-मैत्रिणींप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, मैत्रीचे महत्त्व अधोरेखित करण्याचा आणि या नात्याचे संवर्धन करण्याचा दिवस आहे.

मैत्री हा शब्द जरी लहान असला तरी त्यामागील भावना अत्यंत विशाल आहे. मैत्री म्हणजे केवळ ओळख किंवा सहवास नव्हे; ती विश्वास, जिव्हाळा, समजूतदारपणा, परस्पर आदर आणि निस्वार्थ प्रेम यांची सांगड आहे. जिवलग मित्र-मैत्रीण ही अशी व्यक्ती असते जिच्यासमोर आपण कोणताही आव न आणता स्वतः सारखे राहू शकतो. मनातील आनंद, दुःख, भीती, स्वप्ने, यश, अपयश आणि गुपिते ज्यांच्यासोबत सहजपणे वाटून घेता येतात, अशी व्यक्ती जीवनात फार कमी वेळा मिळते. म्हणूनच जिवलग मैत्री ही जीवनातील सर्वांत मौल्यवान संपत्तीपैकी एक मानली जाते.

राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिन साजरा करण्यामागे एक सुंदर आणि सकारात्मक विचार आहे. आधुनिक काळात तंत्रज्ञानामुळे संवादाची साधने वाढली असली तरी प्रत्यक्ष नात्यांमधील उब अनेकदा कमी होताना दिसते. सोशल मीडियावरील हजारो मित्रांच्या यादीत अनेक नावे असतात; परंतु मन मोकळे करण्यासाठी, संकटात धावून येण्यासाठी आणि निःस्वार्थपणे साथ देण्यासाठी मोजकेच लोक पुढे येतात. अशा परिस्थितीत हा दिवस आपल्याला खऱ्या मैत्रीची जाणीव करून देतो. आपल्यासाठी वेळ काढणाऱ्या, आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनलेल्या मित्र-मैत्रिणींची आठवण करून देतो.

मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मैत्रीचे महत्त्व वेगवेगळ्या स्वरूपात जाणवते. बालपणातील मैत्री ही सर्वांत निरागस असते. शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच मुलांच्या आयुष्यात मित्रांचे आगमन होते. एकत्र बसणे, खेळणे, डबा वाटून खाणे, अभ्यासात मदत करणे आणि छोट्या-छोट्या गोष्टींवरून भांडणे व पुन्हा एकत्र येणे या सर्व अनुभवांमधून मैत्रीची पायाभरणी होते. बालपणीच्या मित्रांसोबतच्या आठवणी आयुष्यभर मनात जपल्या जातात. त्या आठवणींमध्ये कोणताही स्वार्थ नसतो; फक्त निरागस आनंद आणि मनापासूनचा जिव्हाळा असतो. म्हणूनच अनेकदा बालपणीचे मित्र आयुष्यभरासाठी खास राहतात.

किशोरावस्था आणि तरुणाईच्या काळात मैत्री अधिक गहिरी होत जाते. हा काळ व्यक्तिमत्त्व विकासाचा, करिअर घडविण्याचा आणि जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा असतो. या टप्प्यावर मित्र-मैत्रिणींचा प्रभाव खूप मोठा असतो. चांगले मित्र व्यक्तीला सकारात्मक विचार देतात, योग्य सवयी लावतात आणि आत्मविश्वास वाढवतात. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी घरापासून दूर जातात. अशा वेळी मित्र-मैत्रिणीच त्यांचे दुसरे कुटुंब बनतात. अभ्यासातील अडचणी, भविष्याची चिंता, भावनिक चढउतार आणि जीवनातील संघर्ष यामध्ये ते एकमेकांना आधार देतात. त्यामुळे या वयातील मैत्री व्यक्तिमत्त्व घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर मैत्री माणसाच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे तणाव, चिंता, नैराश्य आणि एकाकीपणा यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा वेळी जिवलग मित्र-मैत्रीण हे मानसिक आधाराचे महत्त्वाचे स्रोत ठरतात. मनातील विचार मोकळेपणाने व्यक्त करता येणे, आपल्या भावना कोणीतरी समजून घेणे आणि संकटात धीर देणे यामुळे मानसिक स्वास्थ्य टिकून राहण्यास मदत होते. अनेक संशोधनांमधून असे दिसून आले आहे की मजबूत मैत्री असलेल्या व्यक्ती अधिक आनंदी, आत्मविश्वासपूर्ण आणि सकारात्मक असतात. त्यांच्या जीवनातील समाधानाची पातळीही तुलनेने जास्त असते.

राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक ऐक्य. मैत्री ही जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्तर यांसारख्या भेदांच्या पलीकडे जाणारी भावना आहे. दोन व्यक्तींमध्ये मैत्री निर्माण होण्यासाठी त्यांची मने जुळणे महत्त्वाचे असते. त्यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये सौहार्द आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी मैत्रीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जिथे मैत्री असते तिथे परस्पर आदर, सहकार्य आणि समजूतदारपणा वाढतो.

आजच्या डिजिटल युगात मैत्रीचे स्वरूप बदलले आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम आणि इतर डिजिटल माध्यमांमुळे लोकांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीशी क्षणात संवाद साधता येतो. या माध्यमांमुळे अनेक नवीन मैत्री निर्माण होत आहेत. तथापि, आभासी मैत्री आणि प्रत्यक्ष आयुष्यातील मैत्री यांमध्ये फरक असतो. प्रत्यक्ष भेटीगाठी, भावनिक जवळीक आणि संकटातील साथ या गोष्टी खऱ्या मैत्रीचे खरे मोजमाप ठरतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी नात्यांची उब टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिनाच्या निमित्ताने अनेकजण आपल्या मित्र-मैत्रिणींना शुभेच्छा देतात, त्यांच्यासोबत वेळ घालवतात आणि जुन्या आठवणींना उजाळा देतात. काही लोक भेटवस्तू देतात, काही पत्र लिहितात, तर काही सामाजिक माध्यमांवर आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करतात. परंतु या दिवसाचे खरे महत्त्व कृतीतून व्यक्त होते. मित्रांची विचारपूस करणे, त्यांच्यासाठी वेळ काढणे आणि त्यांच्या आनंद-दुःखात सहभागी होणे हीच खरी मैत्रीची जपणूक आहे.

मैत्री टिकवण्यासाठी संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो. अनेकदा गैरसमज, अहंकार किंवा संवादाचा अभाव यांमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. खऱ्या मैत्रीत मतभेद होऊ शकतात, परंतु मनभेद होऊ नयेत. जिवलग मित्र-मैत्रीण एकमेकांना समजून घेतात, चुका माफ करतात आणि नाते टिकवण्यासाठी प्रयत्न करतात. म्हणूनच मैत्री टिकवण्यासाठी विश्वास, संयम आणि परस्पर आदर आवश्यक असतो.

कामाच्या ठिकाणी निर्माण होणारी मैत्रीही महत्त्वाची असते. कार्यालयीन तणाव कमी करण्यासाठी, सहकार्याची भावना वाढवण्यासाठी आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी मित्रत्वाचे संबंध उपयुक्त ठरतात. सहकाऱ्यांमधील मैत्रीमुळे संघभावना वाढते आणि कार्यक्षमता सुधारते. त्यामुळे व्यावसायिक यशामध्येही मैत्रीचा वाटा असतो.

वृद्धापकाळात मैत्रीचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते. निवृत्तीनंतर अनेकांना एकाकीपणाचा सामना करावा लागतो. अशा वेळी जुने मित्र-मैत्रिणी जीवनात उत्साह आणि आनंद निर्माण करतात. त्यांच्या सहवासामुळे जीवनातील रिकामेपणा कमी होतो. एकत्र बसून जुन्या आठवणींना उजाळा देणे, संवाद साधणे आणि परस्पर आधार देणे यामुळे वृद्धांच्या जीवनाची गुणवत्ता वाढते.

राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिन हा कृतज्ञतेचा दिवस आहे. आपल्या आयुष्यात मित्र-मैत्रिणींनी दिलेल्या आधाराची, प्रेमाची आणि प्रेरणेची आठवण करून देणारा हा दिवस आहे. जीवनातील अनेक यशांमध्ये मित्रांचे योगदान असते. अनेक संकटांमधून बाहेर पडण्यासाठी त्यांची साथ महत्त्वाची ठरते. त्यामुळे या दिवसाच्या निमित्ताने त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त करणे आवश्यक आहे.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जीवनात पैसा, पद आणि प्रतिष्ठा यांना मोठे महत्त्व दिले जाते. परंतु जीवनातील खरा आनंद आणि समाधान हे नात्यांमधूनच मिळते. संकटाच्या काळात बँकेतील शिल्लक किंवा पदाचा दर्जा नव्हे, तर आपल्या सोबत उभे राहणारी माणसे महत्त्वाची ठरतात. मित्र-मैत्रिणी हे अशाच विश्वासू माणसांपैकी असतात. त्यांच्या सहवासामुळे जीवनातील संघर्ष सोपे वाटतात आणि आनंदाचे क्षण अधिक संस्मरणीय बनतात.

शेवटी असे म्हणता येईल की राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिन हा मानवी जीवनातील सर्वांत सुंदर नात्याचा उत्सव आहे. मैत्री ही केवळ एक भावना नाही, तर जीवन जगण्याची एक सुंदर पद्धत आहे. प्रेम, विश्वास, निष्ठा, सहकार्य, समजूतदारपणा आणि त्याग या मूल्यांवर उभे असलेले हे नाते व्यक्तीच्या जीवनाला समृद्ध करते. जिवलग मित्र-मैत्रीण हे सुख-दुःखाचे सहप्रवासी, संघर्षातील आधारस्तंभ, यशाचे प्रेरणास्रोत आणि जीवनातील खरे साथीदार असतात. म्हणूनच ८ जून रोजी साजरा होणारा राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिन हा केवळ दिनविशेष नसून मानवी नात्यांतील जिव्हाळा, विश्वास आणि प्रेम यांचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या मित्र-मैत्रिणींबद्दल कृतज्ञता व्यक्त करूया, त्यांच्यासोबतचे बंध अधिक दृढ करूया आणि आयुष्यभर या अमूल्य नात्याची जपणूक करण्याचा संकल्प करूया. कारण जीवनाच्या प्रत्येक वळणावर साथ देणारा एक खरा मित्र किंवा एक खरी मैत्रीण हीच माणसाच्या आयुष्यातील सर्वांत मोठी संपत्ती असते. मैत्रीचा हा सुगंध प्रत्येकाच्या जीवनात सदैव दरवळत राहो, हीच राष्ट्रीय जिवलग मित्र-मैत्रीण दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# स्वागतार्ह आदेश



भारतीय प्रशासकीय सेवेतील धडाकेबाज अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्त झाली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी सुप्त अवस्थेत असलेल्या नियमांची अतिशय कडक अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांनी राज्यातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना रस्त्यावरील वडापाव विक्रेते, भाजी विक्रेते, हॉटेल्स आणि मिठाई दुकानदारावर छापे टाकून वृत्तपत्राचा वापर थांबवण्याचे आदेश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत थेट गुन्हे दाखल करणे किंवा मोठ्या रकमेचा दंड ठोकण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. मुंढे साहेबांच्या आदेशानंतर FSSI आणि मुंबई महानगरपालिकेने संयुक्त मोहीम हाती घेत अशा विक्रेत्यांवर कडक कारवाई सुरू केली आहे. केवळ मुंबईतच नाही तर राज्यातील अनेक शहरात वृत्तपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई सुरू झाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर सुरू केलेली ही धडाकेबाज कारवाई स्वागतार्ह आहे. या धडाकेबाज कारवाईचे जनतेतून स्वागतच होत असून या करवाईसाठी तुकाराम मुंढे साहेबांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे जाहिर आभारही मानले जात आहे. ही कारवाई सुरू झाल्यानंतर अनेकांना असे वाटले की वर्तमानपत्राच्या कागदात खाद्यपदार्थ देऊ नये हा तुकाराम मुंढे साहेबांचा आदेश आहे प्रत्यक्षात त्यांनी आधीपासून असलेल्या कायद्याची प्रभावी आणि कडक अंमलबजावणी केली आहे. वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ देण्यावर कायद्याने बंदी २०१९ पासूनच आहे मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नव्हती. तुकाराम मुंढे साहेबांनी त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली ही कारवाई पुढे पण अशीच सुरू राहिली पाहिजे कारण खाद्यपदार्थ विक्रेते सर्रासपणे वर्तमानपत्राच्या कागदात भजे, वडापाव, पोहे, उपमा, इडली, डोसा, उडीदवडा, कच्छी दाबेली यासारखे गरम खाद्यपदार्थ बांधून देतात.

भेळ विक्रेतेही वर्तमानपत्राच्या कागदातच भेळ बांधून देतात. पथारीवरील छोटे व्यावसायिकच नव्हे तर छोटे छोटे हॉटेल्स, बेकरी व्यावसायिक, स्नॅक सेंटर, स्वीट होम चालक, फेरीवाले खाद्यपदार्थ बांधण्यासाठी वर्तमानपत्राचा कागद सर्रासपणे वापरतात. टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सच्या तुलनेत हा पर्याय स्वस्त असल्याने निवडला जातो मात्र; असे करणे आरोग्यास हानिकारक आहे. वर्तमानपत्राचा किंवा मासिकाचा कागद अधिक आकर्षित करण्यासाठी डायआयब्युटाइल फटालेट आणि डायईन आयसोब्यूटाईल या केमिकलचा वापर वृत्तपत्र छपाईसाठी केला जातो. हे केमिकल आरोग्यासाठी अतिशय घातक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. याशिवाय वर्तमानपत्राच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये शिसे, कॅडियम आणि झिंक यासारखे जड धातू असतात जेंव्हा गरम किंवा तेलकट पदार्थ (कसे भजे, वडापाव, पोहे) कागदावर ठेवले जातात तेंव्हा ती शाई वितळून अन्नात मिसळते.

शाईमधील रासायनिक घटक पोटात गेल्यास पोटाचे विकार, यकृताचे आजार, किडनी निकामी होणे आणि दीर्घकाळात कॅन्सर सारखे गंभीर आजार होऊ शकतात. अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी मध्यंतरी एक प्रयोग केला. या प्रयोगात त्यांनी वेष्टन म्हणून वापरल्या जाणाऱ्या कागदाचे पृथक्करण करण्याची पद्धत शोधून काढली. यानंतर या शास्त्रज्ञांनी विविध हॉटेल्स, उपहारगृहे यात फास्टफुड बांधून दिल्या जाणाऱ्या वेष्टनाच्या कागदाचे तसेच पदार्थांचे विश्लेषण केले तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की ज्या वेष्टनाच्या कागदावर छपाई केली आहे अशा वर्तमानपत्राचा आणि मासिकाचा कागद वापरलेले खाद्यपदार्थ ज्यांनी सेवन केले आहे त्या लोकांच्या पोटात अनेक घातक घटक गेले आहेत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. हे घातक घटक शरीरात गेल्यावर ते कोणत्या अवयवात जाऊन कोणत्या प्रकारचे दोष निर्माण करतात यावरही त्यांनी संशोधन केले तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले की घातक घटक (केमिकल) किडनी, यकृत, जठर आणि फुफ्फुसावर दुष्परिणाम करतात.

ब्रेडला आवरण म्हणून वापरला जाणारा कागद हा याबाबतीत सर्वाधिक घातक दुष्परिणाम घडणारा असल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले असून त्याचे प्रमाण ५६ टक्के आहे तर बर्गर, सँडविच बांधून दिलेल्या कागदात ३२ टक्के घातक घटक असल्याचे त्यांनी सिद्ध करून दाखवले. वर्तमानपत्राच्या कागदामध्ये देखील मोठ्या प्रमाणात घातक घटक असतात. हे घातक घटक पोटात गेल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात म्हणूनच नागरिकांनी वर्तमानपत्रात बांधून दिलेले खाद्यपदार्थ खाणे टाळले पाहिजे. विक्रेत्यांनीही खाद्यपदार्थ वर्तमानपत्राच्या कागदात बांधून देण्याऐवजी टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सचा वापर करावा. ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने दिलेला हा आदेश अतिशय योग्य असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# समुद्र हा खाद्य व ऑक्सिजन पुरविणारा स्त्रोत



संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर त्याच्या रक्षणाची संधी घेतली जाते.

आंतरराष्ट्रीय समुद्र दिना-निमित्ताने संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश, त्यांतील सागरी परिसंस्थेशी संबंधित संस्था, अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक-अभ्यासक मिळून समुद्राविषयीचे विविध पैलू जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतात. सर्वांनाच सागराबद्दल कुतूहल असते. अर्धी पृथ्वी जरी आपण तिच्या नैसर्गिक स्वरूपात राखू शकलो, तरी तब्बल दहा लाख प्रजातींना नष्ट होण्यापासून आपण वाचवू शकतो, असा शास्त्रज्ञांचा अभ्यासपूर्ण दावा आहे. सांडपाणी, औद्योगिक प्रदूषके, मुदत संपलेली किंवा घातक रसायने, प्लास्टिकच्या बाटल्या आणि पिशव्या समुद्रात टाकल्या जातात. कचरा कोणताही असो, फेका समुद्रात! अहो केवढा मोठा आणि खोल समुद्र असतो? अफाट समुद्राला एवढ्याशा कचऱ्याने काय होतेय? असा गैरसमज जगभरातील व्यक्तीपासून राष्ट्रांपर्यंत बहुतेक सर्वांचाच होत असल्यामुळे आता मात्र परिस्थिती गंभीर बनली आहे. मासे मिळवण्यासाठी अधिकाधिक खोल समुद्रात जावे लागत आहे, पाण्याचा दर्जा घसरला आहे. हवामानावर परिणाम होत आहे. विशिष्ट सजीव नष्ट होऊ लागले आहेत... हे सारे थांबविणे, हेच या दिनाचे खरे ध्येय धोरण आहे.

जागतिक महासागर दिन जगभर ८ जून रोजी पाळला जातो. सन २००८ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या पाळण्याचे ठरविले. त्यापूर्वी सन १९८२पासून कॅनडामध्ये तो साजरा होत असे. कॅनडास्थित आंतरराष्ट्रीय संस्था महासागरांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे, या संस्थेच्या पुढाकाराने सर्वप्रथम या दिवसाची सुरुवात झाली. वर्ल्ड ओशन नेटवर्क सारख्या विविध संस्था, मत्स्यालये, प्राणिशास्त्र विषयात काम करीत असलेल्या संस्था, अशा महत्त्वाच्या संस्था यासाठी एकत्रितपणे योगदान देतात.

संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर त्याच्या रक्षणाची संधी घेतली जाते. ८ जून हा दिवस विश्व महासागर दिन- संपूर्ण विश्वातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. संपूर्ण जगभरात या दिवसाला विशेष महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या साजरा करण्यास का सुरूवात केली? तर समुद्र दूषित होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक बनले आहे. या संदर्भातला प्रस्ताव सन १९९२ साली कॅनडाने ब्राझीलमध्ये झालेल्या वसुंधरा शिकार परिषदेत मांडला. त्याला संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००८मध्ये मान्यता दिली. तेव्हापासून दी ओशन प्रोजेक्ट या अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने हा महासागर दिन आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होत आहे. दरवर्षी एखादा ध्येय ठेवून हा दिवस साजरा केला जातो. सन २०१८मध्ये प्लास्टिकपासून महासागराचे रक्षण, हे ध्येय ठेवण्यात आले होते. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७१ टक्के भूभाग हा विविध प्रकारच्या जलस्रोतांनी व्यापला आहे आणि त्यापैकी तब्बल ९७ टक्के जलसाठा हा खाड्या, समुद्र व महासागरांच्या रूपात आहे.

दी ओशन प्रोजेक्ट या सन १९९७ साली अमेरिकेत स्थापन झालेल्या आणि आता जागतिक झालेल्या प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, संग्रहालये यांच्या संघटनेने एकच महासागर ही संकल्पना मांडली. परंतु भौगोलिकदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्याही या एकच महासागराची पाच खंडांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे समुद्र हा खाद्य आणि विपुल प्रमाणात ऑक्सिजन पुरविणारा स्रोत आहे. तोच जैवविविधतेचे महाकाय भांडार आहे. खरे तर तोच अनेकविध रत्ने, खनिजे, तेल आपल्या उदरात बाळगणारा रत्नाकर होय. ही सर्व वर्णने अपुरी पडतील, अशा अगणित मार्गांनी महासागर मानवासाठी व एकूणातच चराचर सृष्टीसाठी महत्त्वपूर्ण आहे. महासागर कितीही विशाल असले तरी माणसाने केलेला किती कचरा त्यांनी पोटात घ्यावा यालाही अखेर काही मर्यादा आहे. आपण ही मर्यादा ओलांडल्यामुळे तेथील जीवसृष्टीला आणि अन्नसाखळ्यांना धक्का बसला आहे. यामुळे माणसाला मिळणारे मासे तर कमी झाले आहेतच, शिवाय हवामानावरही विपरीत परिणाम होत आहे. मीठागरांना फटका बसत आहे. समुद्रीजल प्रदूषणांमुळे मीठाचे खारेपण ओसरू लागले आहे. शुद्धीकरणास अधिक खर्च येऊ लागला आहे. तेथील मानवी हस्तक्षेप व ढवळाढवळीच्या कारणाने पावसाच्या प्रमाणात चढउतार दिसू लागला आहे. महासागरास जाऊन मिळणाऱ्या घाणेरड्या पाण्याचे प्रमाण हे जास्त, तर अस्सल पाण्याचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. यावरही माणसाला विचार करावाच लागेल, हे निश्चित! आंतरराष्ट्रीय समुद्र दिनाच्या समस्त सूज्ञवान मानवांना हार्दिक शुभेच्छा !!

**–एन. कृष्णकुमार**
गडचिरोली
मो. ९४२३७१४८८३

# नांदेडमध्ये १० जून रोजी नागरी हक्क जागर अभियान



**नांदेड (प्रतिनिधी)** –ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांच्या घटनात्मक हक्कांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग, फेसकॉम नांदेडच्या वतीने बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नांदेड येथे शांततापूर्ण 'नागरी हक्क संरक्षण लक्षवेधी निवेदन फेरी' चे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉम नांदेडचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन व संबंधित विभागांना निवेदनाद्वारे माहिती दिली आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने लावण्यात आलेली आचारसंहिता संपूर्णपणे पाळली जाणार आहे. तसेच संघटनेच्या वतीने पोलीस प्रशासनाला संपूर्ण सहकार्य केले जाणार असल्याचे डॉ. वैद्य यांनी यावेळी सांगितले.

यापूर्वी फेसकॉमच्यावतीने मुंबईतील आझाद मैदानावर व्यापक स्वरूपाचा लक्षवेधी कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, काही अपरिहार्य कारणास्तव व विशेषत: ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा विचार करून हा कार्यक्रम मुंबई ऐवजी नांदेडमध्येच आयोजित करून शासनाचे ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

या जनजागरण फेरीची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून होणार असून, त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत नागरी हक्क संरक्षण लक्षवेधी जनजागरण निवेदन फेरी काढण्यात येणार आहे. फेरीच्या समारोपानंतर काही मोजक्याच पदाधिकाऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येणार आहे.

सध्या लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यात येईल, कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार अथवा उमेदवारांचा उल्लेख केला जाणार नाही, तसेच वाहतूक व कायदा-सुव्यवस्थेला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, अशी हमी देण्यात आली आहे. कार्यक्रमादरम्यान उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना सूचना स्पष्टपणे ऐकू याव्यात यासाठी मर्यादित आवाजात दोन ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यात येणार असून, सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिमर्यादे संदर्भातील निर्देशांचे पालन करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील मार्गदर्शन कार्यक्रम केवळ १५ मिनिटांचा ठेवण्यात येणार असून, त्यानंतर तत्काळ निवेदन सादर करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे.

# वीरशैव-लिंगायत गोलमेज परिषदेचे अहमदपूर येथे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – वीरशैव-लिंगायत गोलमेज परिषदेचे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे बुधवार, दि. १० जून रोजी आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेमध्ये जनगणना २०२६-२७ मध्ये धर्म व जातीची नोंद कशी करावी, महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभव मंडप व परसु कट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा आणि महात्मा बसवेश्वर यांची देशभर शासकीय जयंती साजरी करण्यात यावी या दोन मागण्यांसाठी रामलीला मैदान नवी दिल्ली येथे धडक मोर्चा काढण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. म्हणून वीरशैव परंपरेतील व विरक्त परंपरेतील सर्व मठाधिपती (शिवाचार्य), शिव कीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, शिवा संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व समाजातील बौद्धिक अभ्यासक, साहित्यिक यांची या परिषदेला प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ही परिषद लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली आहे.

वीरशैव-लिंगायत समाजाचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रा. मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय युवक संघटना गेली ३० वर्षे देशभरात व देशाच्या बाहेरील राज्यात काम करत आहे. प्रा. मनोहर धोंडे यांच्या विचारातून साकार होत आहे. वीरशैव-लिंगायत धर्मामधील राज्यातील तरुणांनी आदर्श घ्यावा, अशा पद्धतीची आजपर्यंत अनेक समाजहित जोपासणारी व समाजाच्या न्याय हक्काचे शेकडो प्रश्न शासन दरबारी सोडवून समाजाला न्याय मिळवून देण्यात आला आहे. येणाऱ्या जनगणना २०२६-२०२७ मध्ये वीरशैव-लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशी करावी, आदी विषयांवर एकमुखाने निर्णय होणार आहे.

यावेळी बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा १२ व्या शतकातील मूळ अनुभव मंडप आणि महात्मा बसवेश्वर ज्या परूस कट्ट्यावर बसून न्यायदान करायचे तो परूस कट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा, प्रतिवर्षी अक्षय तृतीया या दिवशी क्रांतीसूर्य जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा, या मुद्यावर वीरशैव गोलमेज परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. या गोलमेज परिषदेस पंचाचार्य मठासह विरक्त मठावरील शंभर मठाधिपती, २०० शिव कीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक व शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शेकडो पदाधिकारी, वीरशैव लिंगायत समाज बांधव, समाजातील साहित्यिक, अभ्यासक असे पाचशे पदाधिकारी उपस्थित राहून चर्चा करून निर्णय घेणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव-लिंगायत समाजातील मठाधिपती, शिव कीर्तनकार, प्रवचनकार, बौद्धिक अभ्यासक, शिवा संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवांनी या गोलमेज परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, शिवा कर्मचारी महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल ताकबिडे, शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, मराठवाडा अध्यक्ष वीरभद्र बसापुरे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील लोहगावकर, जिल्हाध्यक्ष विलास कापसे, कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र पांडागळे, जिल्हाध्यक्ष संभाजी पावडे, जिल्हाध्यक्ष शुभम घोडके, जिल्हाध्यक्ष नंदुआप्पा देवणे, जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर स्वामी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा नंदाताई पाटील, जिल्हाध्यक्षा सौ. सत्यभामा एजगे, महानगराध्यक्ष गजानन कानडे, शहराध्यक्ष शिवराज उमाटे यांनी केले आहे.

# कुख्यात आरोपी 'स्थागुशा'च्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिव्हिटीज (एमपीडीए) अर्थात झोपडपट्टी दादा व सतत कायदा व सुव्यवस्था बाधित करणारा मागील काही दिवसांपासून फरार असलेला कुख्यात आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. त्याला नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तर दुसऱ्या कारवाईत ओमकांत चिंचोलकर यांनी संघर्ष पवळे यालाही अटक केली आहे.

वरिष्ठांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकाला पेट्रोलींग करण्याच्या सुचना दिल्या. त्यावरून हे पथक दि. ५ जून रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्तीयांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ मधील पाहिजे आरोपी सागर सुनिल पवळे हा शासकीय दूध डेअरी येथील पुलाखाली थांबलेला आहे, अशी गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून दुधडेअरी नांदेड येथील पुलाखाली सापळा लावून पाहिजे व आरोपी सागर सुनिल पवळे (वय २१, रा. बळीरामपुर, नांदेड) यास ताब्यात घेवून त्यास पुढील कार्यवाहीसाठी नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीण पोलिसांच्या कारवाईतही संघर्ष सुनील पवळे राहणार बळीरामपूर यालाही अटक करण्यात आली आहे त्याच्याविरुद्धही एमपीडीए अंतर्गत

# डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वॉटर फिल्टर व गिजरचे लोकार्पण



**नांदेड (प्रतिनिधी)** –विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नांदेड जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात रुग्ण व त्यांचे नातेवाईक येत असतात. त्यांच्या सुविधेसाठी संत निरंकारी मंडळ व विश्व सिंधी सेवा संगम सिंधी समाज तसेच महालक्ष्मी ऑटोमोबाईल्स यांच्या संयुक्त माध्यमातून स्वच्छ पाण्याची सुविधा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने सामाजिक सहभागातून दोन वॉटर फिल्टर आणि एक गिजर दान करण्यात आले आहेत. या सुविधांचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख व लता प्रेमचंदानी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी समाजातील विविध घटकांनी लोकसहभागातून पुढे येऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आवश्यक असलेल्या विविध वस्तू उपलब्ध होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, किशोर सांगळे, आहार तज्ज्ञांसह रुग्णालयामधील कर्मचारी व रुग्ण, नातेवाईक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजरत्न केळकर यांनी केले तर कार्यक्रमाचे स्वरूप व रूपरेषा ही कुनाल महागडे यांनी मांडली. या उपक्रमामुळे रुग्णालयातील पिण्याच्या पाण्याच्या सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होणार असून, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळणार आहे.

यावेळी लता प्रेमचंदानी, दीप्ती प्रेमानी, प्रदीप व्यवहारे व होळक यांनी दिलेल्या योगदानाबद्दल अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी विशेष आभार व्यक्त केले.

# 'एमजीएम'मध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला संचालिका डॉ. गीता लाठकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी यंत्रशास्त्र अभियांत्रिकी विभागातील प्रो. जगन्नाथ खंडोजी सावळे यांचे हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा. नारायण कदम, सह प्रमुख प्रा. राहुलकुमार शर्मा, ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे, प्रा. विठ्ठल जाधव, गुरूमितसिंग, डी. आर. पांचाळ आदींसह विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

# हिंदू जनजागृती समितीतर्फे तणाव मुक्तीसाठी अध्याय उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)**– सोमवार, दि. १ जून रोजी हिंदू जनजागृती समितीतर्फे तणाव मुक्तीसाठी अध्याय या विषयावर बालाजी मंदिर विकासनगर कौठा नांदेड येथे प्रवचन घेण्यात आले.

यावेळी प्रवचनात वीस जिज्ञासूंनी सहभाग नोंदवला. प्रवचनात आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये सर्वजण ताणतणावात जगत असतात. प्रवचन माध्यमातून तणावातून मार्ग काढून आनंदी कसे राहता येईल व दुसऱ्यांना पण आनंद कसा देता येईल हे सर्व शिकायला मिळाले. साधना व नामजप करून आपण कसे तणावमुक्त राहू शकतो हे पण लक्षात आले.

यावेळी श्वेता देशपांडे यांनी अभ्यासपूर्ण प्रवचन देऊन उपस्थितांची मने जिंकली.

# २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे १४ जून रोजी आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर मनपा कामगार- कर्मचारी युनियन (रौप्य महोत्सवी वर्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने स्मृतीशेष शंकरराव सावेकर मंचावर फुले- शाहू- आंबेडकर व साठे प्रेरणेचे २१ वे आंबेडकरवादी साहित्य संमेलन रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता शहरातील डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आले आहे.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रख्यात लेखक, प्रखर वक्ते, संपादक संजय आवटे, उद्घाटकपदी एस.सी./एस.टी. आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, ज्येष्ठ नाटककार दत्ता भगत, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, सुप्रसिद्ध साहित्यिक विलास सिंदगीकर, लसाकमचे प्रदेशाध्यक्ष बालाजी थोटवे, ओबीसी नेते इंजि. लक्ष्मण लिंगापूरे, यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवयित्री अर्चना खोब्रागडे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

दुसऱ्या सत्रात काव्यपौर्णिमा हा कवीसंमेलनाचा कार्यक्रम होणार असून, या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवयित्री ज्योती परांजपे, विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध विद्रोही कवी दंगलकार नितीन चंदनशिवे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून रवीचंद्र हडसनकर, डॉ. जगदीश कदम, डॉ. विवेक मवाडे, डॉ. आदिनाथ इंगोले हे राहणार आहेत. यावेळी ५० हून अधिक कवी- कवयित्रींचे कवीसंमेलन संपन्न होणार आहे.

पुढच्या सत्रात नवयान जलसाकार शाहीर सचिन माळी आणि शाहीर शितल साठे यांची मुलाखत डॉ. भीमराव हाटकर आणि बालाजी थोटवे हे घेणार आहेत. समारोपीय सत्रात वंचितच्या राष्ट्रीय नेत्या अंजलीताई आंबेडकर, खासदार श्रीमंत शाहू छत्रपती, खा. रवींद्र चव्हाण हे उपस्थित राहणार असून प्रा. डॉ. शेखर घुंगरवार यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. विजय कदम, नगरसेवक इंजि. प्रशांत इंगोले, इंजि. संघरत्न सोनसळे, एम. सायलू म्हैसेकर, रमेश सोनाळे, महेश देशमुख, नौनिहालसिंघ जहागिरदार यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रेट डीव्होटी ॲवॉर्ड भीमरत्न पुरस्कार-२०२६ स्मृतीशेष नामदेवराव व्हटकर, कोल्हापूर (मरणोत्तर) प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. जयवर्धन व्हटकर हे पुरस्कार स्वीकारणार आहेत. त्यानंतर नवयान महाजलसा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य संयोजक गणेश शिंगे, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, निमंत्रक जी. पी. मिसाळे, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे, संयोजक लालबाजी घाटे, मुख्य समन्वयक ॲड. विजय गोणारकर, कार्यकारी अध्यक्ष सत्यपाल सावंत, सत्यशोधक विचार मंचचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर, सचिव श्रावण नरवाडे, कार्याध्यक्ष मारोती कदम, सचिव राहुल गवारे, उपाध्यक्ष राज गोडबोले, सहकार्याध्यक्ष एन.टी. पंडीत, सहसचिव रमेश कांबळे, उपाध्यक्ष शनीदास वाघमारे, कोषाध्यक्ष प्रभू ढवळे, संजय जाधव, लक्ष्मीकांत हाटकर, एम.डी. जोंधळे, आर.पी. झगडे, रमेश कसबे, शोभा कोकरे, नागोराव डोंगरे, रुपाली वागरे, सुमेध हाटकर, अर्चना गवारे, पी.के. खानापूरकर, गंगाधर धडेकर, संध्या जोंधळे, रंजीता गजभारे, सल्लागार डॉ. बबन जोगदंड, डॉ. नरेंद्र वाघमारे, अनुरत्न वाघमारे, डॉ. राम वनंजे, उपप्राचार्य प्रल्हाद हिंगोले, एन. डी. गवळे आदींनी केले आहे.

# अग्रवाल संघटनेच्या राष्ट्रीय संघटनेवर डॉ. दीपक अग्रवाल यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**– अखिल भारतीय अग्रवाल संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची दोन दिवसीय बैठक इंदोर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष कुलभूषण मित्तल यांनी संघटनेच्या कार्याला गतिशील करण्यासाठी राजकीय नेतृत्व, विकास, उद्योगाशी संबंधित विविध समित्यांची घोषणा केली. यात नांदेड येथील डॉ. दीपक अग्रवाल यांची संघटनेतील कार्य, विकासात्मक कार्य, औद्योगिक क्षेत्राच्या संबंधातील कार्य आदी बाबींची कार्यक्षमता पाहून त्यांची प्रोफेशनल समितीच्या राष्ट्रीय संयोजकपदी नियुक्ती केल्याचे जाहीर केले.

राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याबद्दल रेडक्रॉस नांदेडचे सचिव डॉ. दीपक अग्रवाल यांचे नांदेड रेडक्रॉसचे कार्याध्यक्ष अजयसिंह बिसेन, उपाध्यक्ष डॉ. किरण चिद्रावार, उपाध्यक्ष डॉ. डी. बी. देशमुख, उपाध्यक्ष हर्षद शहा, कोषाध्यक्ष डॉ. भास्कर जन्नावार, रेडक्रॉस ब्लड डोनेशन कमिटीचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध दांडगे, डॉ. अनिल तोष्णीवाल, डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर, डॉ. अशोक कलंत्री, डॉ. दिलीपकुमार शिवाल, डॉ हरदीपसिंग खालसा, डॉ. संजय भक्कड, अमीनभाई थारा आदींनी अभिनंदन केले.

# निर्मिती नर्सिंग कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुक्ता साळवे बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित निर्मिती नर्सिंग कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.

निर्मिती नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजित सोहळ्यात संस्थेच्या अध्यक्षा सौ. उज्ज्वला भावसार म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. राज्याभिषेकामुळे या स्वराज्याला अधिकृत मान्यता मिळाली. या ऐतिहासिक दिनाचे मोठे महत्त्व आहे. या दिनाचे औचित्य साधून मुक्ता साळवे बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित निर्मिती नर्सिंग कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन पार पडला.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सौ. उज्ज्वला भावसार यांचे हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व सांगितले.

# अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेच्या वतीने गुणवंतांचा गुणगौरव

**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्था, जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. १३ जून रोजी दुपारी १२ वाजता नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडियम परिसर) येथे अत्यंत उत्साहात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अ.भा.भो.स.से. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. एकनाथ काटकर यांची उपस्थिती राहणार असून, कार्यक्रमाचे उद्घाटन उत्तर प्रदेशचे माजी खासदार जयप्रकाश सहानी (गोरखपूर) यांच्या हस्ते होणार आहे. तसेच स्वागताध्यक्ष म्हणून राष्ट्रीय महासचिव ॲड. गजानन साटोटे उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक बालाजीराव थोटवे हे या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडतील.

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवणार आहेत. यामध्ये प्रमुख पाहुणे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा-कंधार), आ. संतोष बांगर (कळमनुरी), आ. जितेश अंतापूरकर (देगलूर), आ. बालाजीराव कल्याणकर (नांदेड उत्तर), आ. भीमराव केराम (किनवट), आ. तुषार राठोड (मुखेड), आ. श्रीजयाताई अशोकराव चव्हाण (भोकर), आ. आनंदराव पाटील बोंढारकर (नांदेड दक्षिण), आ. राजेश पवार (नायगाव), आ. बाबुराव पाटील कदम (हदगाव दक्षिण) इत्यादी आमदार व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती राहणार आहे.

तसेच प्रशासकीय व संस्थात्मक पदावरील नामदेव केंद्रे (अतिरिक्त मु.का.अ. हिंगोली), अभिनव वायचळकर (सहायक आयुक्त, म.व्य. नांदेड), अनिल चव्हाण (सहायक निबंधक, दु. नांदेड), चंद्रसेन पाटील (मत्स्य व्यवसाय स.स. महाराष्ट्र राज्य). संस्थेचे राष्ट्रीय व राज्य पदाधिकारी प्रेमजीभाई मेहरा (गुजरात), भाई नानासाहेब लकारे, सविता डाहे (महिला प्रदेशाध्यक्ष), एन. एन. गंदलवाड, सुरेश गौड (दिल्ली), सुपडू खेडकर, योगेश श्रीनाथ, सचिन जमदाडे, चंद्रलाल मेश्राम, गणेश वानखेडे, तुकाराम वानखेडे, हिम्मतराव मोरे, शंकर गवळी, हनुमंत आपटे, विनोद नेमाडे, प्रा. संजय बालाघाटे, आशिष नागला आणि शासकीय योजनांचे माहितीगार पांडुरंग बुद्धेवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे मुख्य साधन आहे. विपरीत परिस्थितीतही आपल्या समाजबांधवांच्या मुलांनी शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश संपादन करून समाजाचे नाव उंचावले आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करणे आणि त्यांना पुढील वाटचालीस बळ देणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. हा केवळ एक सत्कार सोहळा नसून भोई समाजाच्या शैक्षणिक क्रांतीचा उत्सव आहे.

**पांडुरंग गलपवाड**, राष्ट्रीय सदस्य

# भूतान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय महिला संघाला सुवर्णपदक




**लोहा (प्रतिनिधी)** –२ जून ते ४ जून या दरम्यान भूतान येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेमध्ये भारतीय महिला संघाने सुवर्णपदक जिंकले. या संघात मराठवाड्याची एकमेव खेळाडू भारतीय संघात वंशिका उज्ज्वला अनिल कांबळे हिची निवड झाली होती. ती सध्या छत्रपती संभाजीनगर येथे पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तिने या स्पर्धेत यश संपादन करून सामासमुद्रापार तिरंगा फडकविला आहे.

वंशिका उज्ज्वला अनिल कांबळे हिने उत्तम कामगिरी करत भारतीय संघास सुवर्णपदक मिळवून देण्यास मोलाची कामगिरी केली आहे. आट्यापाट्या संघटनेचे जिल्हा सचिव तथा महाराष्ट्र सहसचिव व मुख्य प्रशिक्षक धर्मेंद्र काळे व वंशिका कांबळे आणि पूर्ण भारतीय महिला संघाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तिच्या या यशाबद्दल सरस्वती भवन शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, माजी अध्यक्ष राम भोगले, डॉ. अशोक भालेराव, डॉ. रश्मी बोरीकर, सुनील देशपांडे, छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ, आ. राहुल पाटील, आ. रत्नाकर गुट्टे, अखिल भारतीय आट्यापाट्या महासंघाचे महासचिव दीपक कवीश्वर, महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या महामंडळाचे सचिव अमर चकोले, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे सचिव व महाराष्ट्र राज्य आटपाट्या महामंडळाचे सहसचिव धर्मेंद्र काळे, पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत वाडेकर, महात्मा बसवेश्वर संस्थेचे सचिव अनिल पाडळकर, प्राचार्य सुनील पाडळकर, धनेश्वरी शिक्षण संस्थेचे अनंत भैय्या पाटील, डॉ. उपगुप्त महाथेरो, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे, संजय सारणीकर, कपिल खरात, श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे प्राचार्य विश्वरूप निकुंभ, धर्मेंद्र येवले, राजेंद्र गायकवाड, राजेंद्र कोठावदे, डॉ. प्रवीण खरात, डॉ. धनंजय वडमारे, डॉ. मिलिंद ठोकळे, डॉ. शेख अफसर, शेख रशीद, प्रा. डॉ. अनिल गवळे, ज्ञानेश्वर चाटुपळे आदींसह संपूर्ण महाराष्ट्रातून व देशातून भारतीय आट्यापाट्या महिला संघाचे कौतुक होत आहे.

CMYK

# प्रगतीमंत्र

# 10 वी नंतर काय?



**दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडे करिअर करण्यासाठी अनेक पर्याय असतात. परंतु दहावीनंतर आपण कोणता कोर्स निवडता यावर तुमचं पुढील भवितव्य अवलंबून असतं. दहावीनंतर विद्यार्थी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम करू शकतात. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आयटीआय अभ्यासक्रमदेखील खूप लोकप्रिय आहेत. आयटीआयमध्ये बरेच ट्रेड असतात, ज्यातून विद्यार्थी त्यांच्या आवडीचे विषय निवडू शकतात.**

## टॉप 5 पर्याय !

**विज्ञान, वाणिज्य की कला ? हा एक सामान्य गोंधळ आहे जो बहुतेक विद्यार्थ्यांच्या मनात दहावीचा निकाल लागल्यानंतर निर्माण होतो. आपल्याला आपल्या आयुष्यात काय हवे आहे याबद्दल फार कमी विद्यार्थी स्पष्ट असतात. पण दुसरीकडे, असे अनेक विद्यार्थी आहेत जे दहावीनंतरचे करिअर निवडताना गोंधळलेले असतात. त्यामुळे दहावी, बारावीनंतर आपल्या करिअरच्या दृष्टीकोनातून शिक्षणाचा योग्य मार्ग निवडणे खूप महत्वाचे आहे. आजकाल प्रत्येक क्षेत्रात भरपूर संधी आहेत, परंतु एखाद्याने त्यांच्या आवडीनुसार उचित क्षेत्राची निवड करावी. आज आपण दहावीनंतर करिअर करण्यासाठीच्या पाच पर्यायांबाबत जाणून घेणार आहोत...**



- विज्ञान : विज्ञान अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि संशोधन भूमिका यासारखे अनेक करिअर पर्याय हे क्षेत्र ऑफर करते. पालक आणि विद्यार्थ्यांसाठी हा सर्वात आवडता करिअर पर्याय आहे. विज्ञान क्षेत्राचा मोठा फायदा म्हणजे बारावीनंतर तुम्ही विज्ञानातून वाणिज्य किंवा विज्ञानातून कलाकडे जाऊ शकता. बारावीनंतर विज्ञान शाखेसाठी करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र हे मुख्य विषय आहेत. असे बरेच विद्यार्थी आहेत ज्यांना गणित आवडत नाही किंवा त्यांना त्यात रस नाही, परंतु जर तुम्हाला वैद्यकशास्त्रात करिअर करायचे असेल तर तुम्ही गणित सोडून इतर विषयांची निवड करू शकता.

### विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी करिअर पर्याय

BTech/BE
बॅचलर ऑफ मेडिसिन आणि बॅचलर ऑफ सर्जरी (MBBS)
बॅचलर ऑफ फार्मसी
बॅचलर ऑफ मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी
बीएससी होम सायन्स/फॉरेन्सिक सायन्स

- वाणिज्य : विज्ञानानंतर वाणिज्य हा दुसरा सर्वात लोकप्रिय करिअर पर्याय आहे. व्यवसायासाठी वाणिज्य सर्वोत्तम आहे. जर तुम्हाला संख्या, वित्त आणि अर्थशास्त्राबद्दल आकर्षण असेल तर वाणिज्य तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे. हे चार्टर्ड अकाउंटंट, एमबीए, बँकिंग क्षेत्रातील गुंतवणूक यांसारखे विविध प्रकारचे कॅरियर पर्याय ऑफर करते. यासाठी तुम्हाला अकाउंटन्सी, फायनान्स आणि इकॉनॉमिक्सची माहिती असणे आवश्यक आहे.

### वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी करिअर पर्याय

चार्टर्ड अकाउंटंट
व्यवसाय व्यवस्थापन (Business Management)
जाहिरात आणि विक्री व्यवस्थापन (जाहिरात आणि विक्री व्यवस्थापन)
डिजिटल मार्केटिंग
ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट (Human resource development)

- कला : ज्यांना शैक्षणिक संशोधनात रस आहे त्यांच्यासाठी कला/मानवशास्त्र ही शाखा उत्तम आहे. जर तुम्ही सर्जनशील असाल आणि तुम्हाला मानवतेमध्ये खोलवर जायचे असेल, तर कला शाखा तुमच्यासाठी योग्य आहे. कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल हे मुख्य विषय आहेत. कला आता विविध प्रकारचे करिअर पर्याय ऑफर करते जे विज्ञान आणि वाणिज्य शाखेद्वारे ऑफर केलेल्या प्रमाणेच फायद्याचे आहे.

### कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी करिअर पर्याय

प्रॉडक्ट डिझाइनिंग
मीडिया / पत्रकारिता
फॅशन तंत्रज्ञान
व्हिडिओ निर्मिती आणि संपादन (Video Creation and editing)
एचआर प्रशिक्षण, शालेय शिक्षण आदी.

- ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) : ही प्रशिक्षण केंद्रे आहेत जी शाळा पूर्ण केल्यानंतर सहज रोजगार शोधणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम उपलब्ध करून देतात. कमी कालावधीत कोणताही तांत्रिक अभ्यासक्रम पूर्ण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयटीआय अभ्यासक्रम उत्तम संधी आहेत. आयटीआयमधील अभ्यासक्रम पूर्ण करून, विद्यार्थ्यांना आता औद्योगिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते आणि ते त्याच क्षेत्रात काम करून उदरनिर्वाह करू शकतात.

### ITI नंतरचे करिअर पर्याय

सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीच्या संधी जसे की पीडब्ल्यूडी आणि इतर.
खासगी क्षेत्रातील नोकऱ्या
स्वयंरोजगार
परदेशातील नोकऱ्या
त्यांच्या स्पेशलायझेशनमध्ये पुढील अभ्यास

- पॉलिटेक्निक अभ्यासक्रम : दहावीनंतर विद्यार्थी मेकॅनिकल, सिव्हिल, केमिकल, कॉम्प्युटर, ऑटोमोबाईल या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांसाठी जाऊ शकतात. ही महाविद्यालये ३ वर्षे, २ वर्षे आणि १ वर्षासाठी पदविका अभ्यासक्रम चालवतात. खर्च-प्रभावीता, कमी कालावधीत नोकरी हे १०वी नंतर डिप्लोमा कोर्सचे फायदे आहेत.

विद्यार्थी नेहमी लोकप्रिय कोर्सकडे धाव घेतात. मग त्या कोर्समधून हजारो मुलं शिक्षण घेतात. त्यातली अनेक बेरोजगारच राहतात. याउलट फुटवेअर टेक्नॉलॉजी, मेटलर्जीसारख्या विषयातून राज्याभरातून अवघी १२० मुलंच दरवर्षी बाहेर पडत असल्याने त्यांना लगेच नोकरी मिळते. काही वेळा या कोर्ससाठी हुशार मुलं प्रवेशही घेत नसल्याने अवघ्या ४० टक्के मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळतो आणि त्यांना नोकरीचीही संधी चालून येते. तेव्हा नीट विचार करून पर्याय निवडा....

## चांगला पगार देणारे काही पर्याय...

दहावीनंतर बहुतेक विद्यार्थी विज्ञान, वाणिज्य आणि कला यापैकी एक शाखा निवडतात आणि त्यानुसार करिअरसाठी पर्याय शोधतात. येथे आम्ही काही करिअरचे पर्याय देत आहोत, जे तुम्ही दहावीनंतर निवडू शकता...

- मार्केटिंगमध्ये डिप्लोमा (Diploma in Digital Marketing) : दहावीनंतर तुम्ही हा कोर्स करू शकता याचा कालावधी १ ते ३ वर्षांपर्यंत असू शकतो. यामध्ये तुम्हाला मार्केटिंग कसे केले जाते याची सविस्तर माहिती मिळेल. पगार : प्रतिवर्ष ३ ते १८ लाख रुपये पगार
- बिझनेस अँडमिनस्ट्रेशनमध्ये डिप्लोमा (Diploma in Business Administration) : दहावीनंतर तुम्ही बिझनेस ॲडमिस्ट्रेशनमध्ये डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स करू शकता. तुम्हाला बिझनेस कसा उभारावा, बिझनेस यशस्वी होण्यासाठी विविध स्टॅट्रजी कशा आखाव्या याबाबत सविस्तर माहिती मिळेल. या कोर्सच्या आधारे तुम्हाला चांगल्या पगाराची नोकरी मिळू शकते. पगार : प्रतिवर्ष ९ ते २० लाख रुपये पगार



- सरकारी नोकरी ( Government Jobs) : भारतामध्ये सरकारी नोकरी करणाऱ्यांना चांगला पगार मिळतो आणि त्यांच्याकडे नोकरीची सुरक्षिततादेखील असते त्यामुळे याकडे १०वी इयत्तेनंतर करिअरचा अत्यंत योग्य पर्याय म्हणून पाहिले जाते. यासाठी तुम्हाला स्पर्धा परिक्षेची तयारी करावी लागेल. पगार प्रतिवर्ष २.१ ते २१ लाख रुपये पगार
- फॅशन टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा (Diploma in Fashion Technology) : हा कोर्स, सामान्यतः एक वर्षासाठी केला जातो जो तुम्हाला तुमच्या सर्जनशील क्षमता वाढवण्यात आणि तुमच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तुम्हाला आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज करण्यात मदत करेल. पगार : प्रतिवर्ष ३ ते ६.५ लाख रुपये पगार
- इंटेरिअर डेकोरेशनमध्ये डिप्लोमा (Diploma in Interior Decoration) : हा कोर्स पूर्ण होण्यासाठी १-२ वर्षे लागतात, ज्यामध्ये तुम्हाला घर, कार्यालय किंवा इतर कोणत्याही जागेचे इंटेरिअर डिझाइन करण्याच्या विविध पैलूंचा समावेश असतो आणि इंटेरिअर डिझाइन उद्योगात प्रवेश करण्यासाठी पाया म्हणून काम करतो. पगार : प्रतिवर्ष २ ते १६.० लाख रुपये
- कॉस्मेटोलॉजी अँड हेल्थमध्ये सर्टीफिकेट कोर्स ( Certificate in Cosmetology & Health) : दहावीनंतर कॉस्मेटोलॉजी आणि आरोग्यमधील हा कोर्स केल्याने तुम्हाला परवानाकृत ब्युटी थेरपिस्ट होता येते. पगार :प्रतिवर्ष १ ते ३ लाख रुपये
- ग्राफिक डिझाईनिंगमध्ये डिप्लोमा ( Diploma in Graphic Designing) : दहावीनंतर ग्राफिक डिझाईनमध्ये डिप्लोमा मिळवून कलाप्रेमी त्यांच्या आवडीचे करिअर निवडू शकतात. पगारः ग्राफिक डिझायनर ( प्रतिवर्ष ३ लाख रुपये ), वेब डेव्हलपर (प्रतिवर्ष २.९ लाख रुपये ), क्रिएटिव्ह डायरेक्टर (प्रतिवर्ष १२.२ रुपये लाख)
- हॉटेल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा (Diploma in Hotel Management) : हॉटेल मॅनेजमेंटचा हा तीन वर्षांचा डिप्लोमा कोर्स आहे. हॉटले मॅनेजमेंट, ज्यामध्ये मॅनेजमेंटच्या विविध पैलूंचा समावेश आहे. पगारः हाउसकीपिंग मॅनेजर (प्रतिवर्ष १.९ ते ७.५ लाख रुपये ), आउटलेट मॅनेजर ( प्रतिवर्ष ४ लाख रुपये )
- इंजिनअरिंगमध्ये डिप्लोमा (Diploma in Civil Engineering) : सिव्हिल इंजिनीअरिंगमधील हा तीन वर्षांचा डिप्लोमा आणि सिव्हिल इंजिनीअरिंगमधील बॅचलर पदवीचा अभ्यासक्रम लक्षणीयरीत्या समान आहे ज्यामुळे डिप्लोमा पदवीच्या समतुल्य मानला जातो. तुम्ही तुमच्या आवडीनुसार तुम्हाला हव्या त्या विषयामध्ये पदवी किंवा डिप्लोमा करू शकता. पगारः प्रतिवर्ष ३ लाख रुपये.
- इंजनिअरिंग टेक्नलॉजीमध्ये डिप्लोमा (Diploma in Engineering Technology) : हा तंत्रज्ञानातील तीन वर्षांचा डिप्लोमामध्ये तुम्हाला आयटी टेक्नॉलॉजी, कॉप्युटर ॲप्लिकेशन. आयटी इंजिनिअरिंग आणि संबंधित विषयांमधील मूलभूत ज्ञान मिळते. पगार : प्रतिवर्ष ३.५ ते ८ लाख रुपये

## सायन्स

- पीसीएमबी : बारावीतील फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स आणि बायोलॉजी या चारही विषयांवर आधारित बायो केमिस्ट्री, बायो मेडिकल इंजिनीअरिंग, बायो टेक्नॉलॉजी, बायो इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी अशा विषयांकडे जाता येतं.
- पीसीएम : या विषयांनुसार आर्किटेक्चर, डिफेन्स, नेव्ही, इंजिनीअरिंग, पायलट ट्रेनिंग, टेक्नॉलॉजीकडे वळता येतं.
- पीसीबी : मेडिकल, व्हेटर्नरी सायन्स ॲण्ड ॲनिमल हजबण्डरी, पॅरामेडिकल कोर्सेस, ॲग्रीकल्चर सायन्स अशा विषयांसाठी हा ग्रुप उपयोगी पडतो.
- एव्हिएशन, फूड सायन्स, फोरेन्सिक सायन्स, एन्व्हायर्न्मेंटल सायन्स, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, लाइफ सायन्स, मॅथमेटिक्स यात पदवी अभ्यासक्रम करता येतो. हे सर्व कोर्स चार ते पाच वर्षांचे असून त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते.

## आयटीआय अभ्यासक्रम

- आयटीआयमध्ये बरेच ट्रेड आहेत, जे विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार निवडू शकतात. काही लोकप्रिय कोर्स असे : आयटीआय टर्नर, आयटीआय मेकॅनिक, आयटीआय वेल्डर, आयटीआय प्लंबर, आयटीआय इलेक्ट्रीशियन.

## डिप्लोमा

- दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अभियांत्रिकी विषयात डिप्लोमा करू शकतात, त्यासाठी दहावीत गणित व विज्ञान विषय विद्यार्थ्यांनी घेतलेले असावेत. हे डिप्लोमा कोर्स ३ वर्षांचे असतात. काही डिप्लोमा अभ्यासक्रमांची नावे अशी : डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन टेक्सटाइल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन सिविल इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन आयसी इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन ईसी इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन माइनिंग इंजिनीअरिंग. या डिप्लोमा अभ्यासक्रमांनंतर विद्यार्थ्यांना थेट इंजिनीअरिंगच्या पदवीला द्वितीय वर्षाला प्रवेश मिळतो.

## फाइन आर्ट्स

- आर्ट ॲण्ड क्राफ्ट, सिरॅमिक ॲण्ड पॉटरी, डान्स, ड्रॉइंग, फर्निचर ॲण्ड इंटेरिअर डिझाइन, म्युझिक, स्कल्प्चर अशा कलेशी संबंधित विषयांमध्येही करिअर होऊ शकतं. मात्र त्यासाठी विषयाची आवड आणि कौशल्य लागतं. लहानपणापासून या विषयांचा अभ्यास केला तर त्यात करिअरसाठी उत्तम संधी आहेत.

## बॅचलर इन डिझायनिंग

- काळानुरुप प्रत्येक वस्तूचं डिझाइन बदलत राहतं. प्रत्येक वस्तू वेगळ्या पद्धतीने प्रेझेंट केली जाते. हे डिझाइन करण्यासाठी प्रोडक्ट डिझाइन, फर्निचर ॲण्ड इंटिरिअर डिझाइन, सिरॅमिक ॲण्ड ग्लास डिझाइन, ग्राफिक डिझाइन, ॲनिमेशन, व्हिडिओ कम्युनिकेशन अशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मात्र यासाठी केवळ चित्रकला पुरेशी नसून कल्पनाशक्तीची गरज असते.

### उद्योजक व्हा

करिअरसाठी तुमच्याकडे भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण फक्त नोकरी करण्याच्या विचाराने त्याकडे पाहू नका. मनात कायम जिज्ञासा ठेवली, झोकून काम केलं, चिकाटी, प्रामाणिकता, गणिती वृत्ती ठेवली तर व्यवसायातही यश मिळू शकतं. चांगल्या मार्गाने पैसे कमावण्याचा विचार आणि व्यवहारी वृत्ती ठेवली पाहिजे. तरुणांना स्वयंरोजगार निर्माण करता येईल, या हेतूने शासनाने पॉलिटेक्निक कोर्स सुरू केले. मात्र शासकीय तसंच खाजगी संस्थांमधून बाहेर पडणारी मुले केवळ नोकरीचाच विचार करतात, स्वतः उद्योग सुरू करून इतरांना नोकरी देत नाहीत, त्यामुळे नोकऱ्यांचा तुटवडा निर्माण होतो.



## अकरावीत कोणती स्ट्रीम निवडावी?



**अकरावी प्रवेश हा मुलांच्या करिअरचा पाया असतो. शालेय शिक्षण संपवून विद्यार्थी करिअरच्या दिशेने पहिलं पाऊल टाकत असतात. अशावेळी आपली आवड काय? आपल्याला आयुष्यात काय करायचंय? याची माहिती असणं आवश्यक असतं. करिअरबाबत योग्य निर्णय घेणे सोपे नाही. कधी कधी काही निर्णय चुकतात. पण तरीही तुम्ही तुमच्या परीने प्रयत्न करत राहायला हवे. अकरावीमध्ये कोणती स्ट्रीम निवडावी? असा प्रश्न बहुसंख्य विद्यार्थ्यांना पडतो. आपण याबद्दल माहिती घेऊया...**

- तुमच्या आवडीला प्राधान्य द्या : अकरावीसाठी कोणतीही स्ट्रीम निवडताना तुम्हाला तुमची आवड समजून घ्यावी लागेल. तसेच तुम्हाला भविष्यात काय बनायचे आहे हे देखील माहित असले पाहिजे. एखाद्या विषयाचा अभ्यास करताना त्याच्याशी जोडले जाणेही महत्त्वाचे आहे.
- तुमची ताकद समजून घ्या : आवडीची फील्ड



समजल्यानंतर तुमची ताकद ओळखा आणि त्यानंतर निर्णय घ्या. बहुतेक विद्यार्थ्यांचा कल विज्ञान शाखेकडे असतो. पण त्यांना सोशल सायन्समध्ये चांगले गुण असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी विज्ञानाऐवजी मानवता (कला) निवडणे हा उत्तम पर्याय ठरतो.

- करिअर काऊन्सेलरची मदत घ्या : स्ट्रीम निवडताना काही अडचण आल्यास तज्ज्ञांकडून करिअर मार्गदर्शन घ्या. हे समुपदेशक उत्तम मार्गदर्शन करण्यासाठी विविध करिअर पर्याय आणि विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करतात. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यांचीही मदत घेऊ शकता.
- कोणाच्या दबावाखाली निर्णय घेऊ नका : अनेक विद्यार्थी त्यांचे पालक, नातेवाईक, मित्र किंवा घरातील मोठ्या मंडळांच्या दबावाखाली स्ट्रीम निवडण्याचा निर्णय घेतात. कधी कधी असे निर्णय आयुष्यातील सर्वात मोठी चूक ठरतात. कोणाच्याही दबावाखाली तुम्ही कोणताही निर्णय घेऊ नका हेच बरे होईल. तुमची आवड आणि क्षमता समजून घेऊनच प्रवाह निवडा.
- प्रत्येक स्ट्रीममध्ये करिअरच्या चांगल्या संधी : मॅथ्य (मॅथ्स/बायो), कॉमर्स आणि आर्ट्स या तिन्ही स्ट्रीममध्ये उत्तम करिअरच्या शक्यता आहेत. अकरावीमध्ये तुम्ही कोणती स्ट्रीम निवडाल त्यांच्याशी संबंधित पदवी अभ्यासक्रम आधीच तपासा. यासह, तुम्ही तुमच्या करिअरच्या ध्येयांबद्दल स्पष्ट व्हाल आणि त्यानुसार अभ्यास करू शकाल.

# आषाढी पालखी सोहळ्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर; पुण्यात २ दिवस रंगणार भक्तीचा महोत्सव



**पुणे (प्रतिनिधी)–** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलभक्तीच्या रंगात रंगला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या आषाढी पालखी सोहळ्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यंदा जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३४१ वे वर्ष असून दोन्ही प्रमुख पालख्यांच्या प्रस्थानाच्या तारखा आणि मुक्कामांची माहिती निश्चित करण्यात आली आहे.

**संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २०२६**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी ७ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजता देहू नगरीतून पंढरपूरच्या दिशेने ऐतिहासिक प्रस्थान करणार आहे.

**संत तुकाराम महाराज पालखीचे मुक्काम**

७ जुलै २०२६ (पहिला मुक्काम): इनामदार वाडा, देहू (पिंपरी-चिंचवड), ८ जुलै २०२६ (दुसरा मुक्काम): श्री विठ्ठल मंदिर, आकुर्डी (पिंपरी-चिंचवड), ९ आणि १० जुलै २०२६ (तिसरा व चौथा मुक्काम): श्री निवडुंगा विठ्ठल मंदिर, नाना पेठ (पुणे शहर), ११ जुलै २०२६ (पाचवा मुक्काम): कदमवाक वस्ती, लोणी काळभोर नवीन पालखी तळ (पुणे ग्रामीण), १२ जुलै २०२६ (सहावा मुक्काम): श्री भैरवनाथ मंदिर, यवत (पुणे ग्रामीण), १३ जुलै २०२६ (सातवा मुक्काम): श्री विठ्ठल मंदिर, वरवंड (पुणे ग्रामीण), १४ जुलै २०२६ (आठवा मुक्काम): उंडवाडी गवळ्याची, पालखी तळ (पुणे ग्रामीण), -१५ जुलै २०२६ (नववा मुक्काम): शारदा विद्यालय प्रांगण, बारामती (पुणे ग्रामीण), ६ जुलै २०२६ (दहावा मुक्काम): सणसर, पालखी तळ (पुणे ग्रामीण), १७ जुलै २०२६ (अकरावा मुक्काम): निमगाव केतकी, पालखी तळ (पुणे ग्रामीण), १८ जुलै २०२६ (बारावा मुक्काम): इंदापूर, पालखी तळ (पुणे ग्रामीण), १९ जुलै २०२६ (तेरावा मुक्काम): सराटी, पालखी तळ (पुणे ग्रामीण), संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२६. दुसरीकडे, संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा ८ जुलै २०२६ रोजी आळंदी येथून प्रस्थान करणार आहे. एकूण ३३ दिवसांच्या या भक्तिमय प्रवासानंतर पालखी ८ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा आळंदीत परतणार आहे.

**पुण्यातील मुक्कामाचा पेच अखेर सुटला**

माऊलींच्या पुण्यातील मुक्कामावरून गेल्या काही दिवसांपासून संभ्रमाचे वातावरण होते. मात्र, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विठोबा मंदिरातील आवश्यक सुविधांबाबत लेखी हमी दिल्यानंतर हा प्रश्न मार्गी लागला. झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पुण्यातील मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरातच होणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे वारकरी आणि भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे सुरुवातीचे प्रमुख मुक्काम**

८ जुलै २०२६ (पहिला मुक्काम): गांधी वाडा, आळंदी, ९ आणि १० जुलै २०२६ (दुसरा व तिसरा मुक्काम): श्री विठोबा मंदिर, भवानी पेठ (पुणे शहर), ११ आणि १२ जुलै २०२६ (चौथा व पाचवा मुक्काम): सासवड (पुणे ग्रामीण), १३ जुलै २०२६ (सहावा मुक्काम): जेजुरी (पुणे ग्रामीण), - १४ जुलै २०२६ (सातवा मुक्काम): वाल्हे (पुणे ग्रामीण), १५ जुलै २०२६ (आठवा मुक्काम): लोणंद (पुणे ग्रामीण), १६ जुलै २०२६ (नववा मुक्काम): तरडगाव (पुणे ग्रामीण).

विशेष म्हणजे, संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज या दोन्ही पालख्यांचे ९ आणि १० जुलै रोजी पुणे शहरात मुक्काम असणार आहेत. नाना पेठ आणि भवानी पेठ परिसरात दोन दिवस भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळणार असून लाखो वारकरी आणि भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने स्वागत, वाहतूक नियोजन आणि सुरक्षेसाठी व्यापक तयारी सुरू केली आहे.

# इस्रायलकडून हिजबुल्लाहच्या १५० ठिकाणांवर भीषण हल्ले; ब्रिगेडियर जनरल, कॅप्टनसह १२ जणांचा मृत्यू

**नवीदिल्ली (वृत्तसंस्था)–** इस्रायलच्या सैन्याने दक्षिण लेबनानमध्ये हिजबुल्लाहच्या सुमारे १५० ठिकाणांवर भीषण हवाई हल्ले केले आहेत. मध्यस्थीच्या चर्चांना वेग आला असतानाही इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू माघार घेण्याच्या भूमिकेत नसल्याचे दिसत आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर दोन्ही बाजूंमध्ये अटींसह युद्धविरामावर सहमती झाल्याच्या काही दिवसांतच दक्षिण लेबनानमध्ये झालेल्या इस्रायली हल्ल्यांमध्ये किमान १२ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये लेबनानी सैन्याचे वरिष्ठ अधिकारीही आहेत.

लेबनानच्या सैन्याने दिलेल्या माहितीनुसार, खारदाली-नबातियेह मार्गावर लष्करी वाहनावर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात एका ब्रिगेडियर जनरल, एका कॅप्टन आणि



एका सैनिकाचा मृत्यू झाला. दुसरीकडे, इस्रायली सैन्याने हा हल्ला सक्रिय युद्धक्षेत्रात करण्यात आल्याचे म्हटले आहे. लेबनानी सैन्याने आरोप केला की, इस्रायलकडून वारंवार आणि जाणीवपूर्वक केले जाणारे आक्रमण कोणत्याही शांततापूर्ण तोडग्यापर्यंत पोहोचण्याच्या सर्व प्रयत्नांना हाणून पाडण्याच्या उद्देशाने केले जात आहे.

लेबनानचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध करताना तो लेबनानच्या सार्वभौमत्वाचे तसेच आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. तसेच, लेबनानचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनीही या कारवाईचा निषेध नोंदवला आहे. एका निवेदनात पंतप्रधान नवाफ सलाम यांनी ब्रिगेडियर जनरल वस्साम सबरा, कॅप्टन एली खौरी आणि सैनिक हुसेन गोजल यांच्या कुटुंबीयांप्रती तसेच लेबनानी सैन्याप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

## शरीरात लपवून सोन्याची तस्करी, ५ कोटींचं सोनं जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)–**मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी असल्यानं मुंबईत रोज कुणी ना कुणी आपलं पोट भरण्यासाठी येत असतं. या शहराला 'स्वप्नांचं शहर' देखील म्हटलं जातं. या शहरात दररोज अब्जावधींची उलाढाल होत असते, त्यामध्ये अवैध धंदे, तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीच्याही घटना समोर येतात. याचदरम्यान, 'ऑपरेशन गोल्डन नेक्सस' अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर डीआरआयने सोन्याच्या तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

डीआरआयच्या मुंबई विमानतळावरील कारवाईत सुमारे ३.२ किलो परदेशी सोन्याची पावडर जप्त करण्यात आली असून त्याची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे.

# कराडमध्ये शासकीय अभियंत्याची हत्या; संशयावरून नातेवाईकांना अटक

**कराड (प्रतिनिधी)–** सातारा जिल्ह्यातील कराड शहरात एका शासकीय अभियंत्याची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. या हत्येमागील सर्वांनाच हादरवून टाकणारं सत्य समोर आले आहे. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेचा तपास करताना पोलिसांनी हा नियोजित खून असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणात मृत अभियंत्याच्या जवळच्या नातेवाईकाला अटक करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण श्रीरंग मंडले (वय ४५) हे ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे जलसंधारण विभागात अभियंता म्हणून कार्यरत होते. सलग सुट्टी असल्याने ते ठाण्याहून कराडला घरी येत होते. शनिवारी पहाटे ते कराडमध्ये उतरून घराकडे जात असताना एका कारने त्यांना जोरदार धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या मंडले यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये कारने धडक दिल्यानंतर चालकाने वाहन पुन्हा मागे घेऊन मंडले यांच्यावर आणखी वारंवार गाडी चालवल्याचे दिसून आले. त्यामुळे हा अपघात नसून घातपात असल्याचे स्पष्ट झाले.

तपासादरम्यान पोलिसांना आणखी धक्कादायक माहिती मिळाली. मंडले यांच्या पत्नी सुरेखा मंडले आणि तिचा भाऊ संग्राम चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वीच हत्येचा कट रचल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्राथमिक तपासानुसार, या गुन्ह्यासाठी काही व्यक्तींना पैशांचे आमिष दाखवून काम सोपवण्यात आले होते.

घटनेच्या दिवशी मंडले यांनी कराडमध्ये पोहोचल्यानंतर पत्नीला फोन करून आपल्याला घेण्यासाठी येण्यास सांगितले होते. याच माहितीच्या आधारे आरोपींना त्यांच्या हालचालींची माहिती मिळाल्याचे तपासात समोर आले आहे.

या प्रकरणात पोलिसांनी मुख्य सूत्रधार पत्नी सुरेखा मंडले आणि मेहुणा संग्राम चव्हाण यांना अटक केले. हल्ले करणारे दोन जण फरार झाल्याची माहिती आहे. हल्ला करणाऱ्या अन्य दोघांचा शोध सुरू आहे. त्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून विविध पुरावे गोळा केले जात आहेत.

# एमपीएससीच्या परीक्षार्थ्यांना आता परीक्षा केंद्रावर दीड तास आधी पोहोचणे अनिवार्य; नवीन नियमावली जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या शिस्तपालनासाठी आयोगाने कडक पावले उचलली आहेत. आगामी रविवार, १४ जून २०२६ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी आयोगाने नवीन आणि कठोर नियमावली जाहीर केली आहे. आता उमेदवारांना परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेच्या दीड तास आधी उपस्थित राहणे बंधनकारक असणार आहे.

**वेळेचे नियोजन:** परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान दीड तास (९० मिनिटे) आधी परीक्षा उपकेंद्रावर पोहोचणे अनिवार्य आहे.

परीक्षा कक्ष प्रवेश: प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास आधी स्वतःच्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे गरजेचे आहे.




**उशिरा येणाऱ्यांसाठी प्रवेश बंदी:** विहित वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही. अशा स्थितीत होणाऱ्या नुकसानीस आयोग जबाबदार राहणार नाही.

**प्रवेश प्रमाणपत्र:** आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (https://mpsconline.gov.in) डाऊनलोड केलेले मूळ प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश नाकारला जाईल.

**आयोगाचा इशारा:** परीक्षांच्या दिवशी आंदोलने, वाहतूक कोंडी किंवा अतिवृष्टीसारख्या समस्या उद्भवू शकतात, हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी वेळेपूर्वी निघणे गरजेचे आहे. आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित उमेदवारावर ठराविक कालावधीसाठी किंवा कायमस्वरूपी परीक्षेला बसण्यावर बंदी घातली जाऊ शकते.

१. आयोगाच्या संकेतस्थळावर जाऊन आपले प्रवेश प्रमाणपत्र वेळेत डाऊनलोड करा. २. 'गायडन्स ऑफ एक्झामिनेशन' या सदराखाली दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना पुन्हा एकदा शांतपणे वाचा. ३. परीक्षेच्या आदल्या दिवशीच परीक्षा केंद्राचे अंतर आणि प्रवासाचे साधन निश्चित करा.

# मुंबई-गुजरात महामार्गावर गॅस टँकर उलटल्याने वाहतूक कोंडी



**मुंबई (प्रतिनिधी) –** मुंबई-गुजरात महामार्गावरून जात असताना गॅस टँकर उलटला. चालकाचे नियंत्रण सुटले आणि गॅस टँकर खोल खड्ड्यात उलटला. अपघात झाला आणि टँकरमधून कार्बन डायऑक्साइड (उज२) वायूची गळती झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि रसायन तज्ज्ञ यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि गळती रोखण्याचे प्रयत्न सुरू केले. वायू वेगाने हवेत पसरत होता त्यामुळे महामार्गावर सुरू असलेली वाहतूक ठप्प झाली.

ही घटना आज म्हणजेच रविवारी (७ जून २०२६) सकाळी दहाच्या सुमारास झाली. याआधी काही दिवसांपूर्वी मुंबईतील गजबजलेले ठिकाण दादर या परिसरात देखील गॅस पाइपलाइनची गळती झाली होती. प्रशासनाने काही काळासाठी दादरचा एक मोठा परिसर सील केला होता. तातडीने उपाय केल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

दादर (पश्चिम) येथील गोखले रोडवरील अनुग्रह हॉटेलजवळ महानगर गॅस लिमिटेडच्या पाइपलाइनमधून सायंकाळी सहाच्या सुमारास गळती झाली होती. मुंबई अग्निशमन दल, मुंबई पोलीस आणि महानगर गॅस लिमिटेडची पथके घटनास्थळी पोहोचली.दुरुस्तीच्या कामासाठी चत्रऋ ने बाधित परिसरातील गॅस पुरवठा तात्पुरता बंद केला. वेळेत उपाय करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

## सातारा परिसरातील तलावात बुडून ३ जण मृत्युमुखी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –**शहरातील सातारा परिसरातील साई टेकडीजवळ सकाळी तलावावर पोहण्यासाठी गेलेल्या ६ मित्रांपैकी ३ जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्याने एक मित्र पाण्यात बुडू लागला, त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात इतर दोघेही पात्रात ओढले गेले आणि तिघांनीही आपले प्राण गमावले.

पाण्यात बुडणाऱ्या मुलांना वाचविण्यासाठी अग्निशमन दल आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या तत्परतेमुळे उर्वरित दोन मुलांना जिवंत बाहेर काढण्यात यश आले.


क्र.२०२६/दंडाधिकार/जन्म मृत्यु/सीआर-
तहसिल कार्यालय अर्धापुर
दिनांक. ०५/०६/२०२६

## जाहीर प्रगटन

मा. तहसीलदार अर्धापूर तथा तालुका दंडाधिकारी अर्धापूर यांचे न्यायालयात अर्ज क्र. १२०/२०२५.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार रामराव सखाराम नांदेडकर रा.आंबेगाव ता. अर्धापूर यांनी त्यांचे पाल्य सुप्रिया रामराव नांदेडकर हीच्या जन्म नोंद आदेशासाठी या कार्यालयात जन्म नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचे पाल्य सुप्रिया रामराव नांदेडकर हीचा दि. १४/०४/२००९ रोजी ची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय आंबेगांव ता. अर्धापूर जिल्हा नांदेड येथे उपलब्ध नाही, असे ग्रामपंचायत अधिकारी यांनी दिनांक २४/०९/२०२५ रोजीच्या प्रमाणपत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी या जाहिरप्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, वरील सुप्रिया रामराव नांदेडकर रा.आंबेगाव ता. अर्धापूर यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटनापासून १५ दिवसात या कार्यालयास आपला आक्षेप नोंदवावा. दिलेल्या तारखेपर्यंत आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक ०५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

तहसीलदार, अर्धापूर



## जाहीर प्रगटन (मृत्युनोंदणी आदेशासाठी)

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख उस्मान शेख हैदर वय ७४ रा. महालिंगी कॉलनी, हनुमान मंदिर कंधार ता. कंधार, जि. नांदेड मो. नं. ९४०३३३१३८४ यांनी या कार्यालयात त्यांचे मुलीचे मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

मृत्यू झालेल्याचे नाव आसेफा अंजुम शेख सद्दाम रा. १-१६-५९३ विष्णुनगर, मस्जीद ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा राहते १-१६-५९३ विष्णुनगर, मस्जीद, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १५.०५.२०२१ या दिवशी मृत्यू झाला असून, मृत्यु प्रमाणपत्र मिळणेकरिता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात अर्जदार यांनी दिनांक ०७.०४.२०२६ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे. वरील मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १९.०५.२०२६
स्थळ - नांदेड

तहसीलदार नादेड तथा
तालुका दंडाधिकारी नांदेड करिता



## जाहीर प्रगटन

सदरील जाहीर प्रगटणाव्दारे सर्वाना सुचित करण्यात येते कि. मौजे असदुलाबाद ता.जि. नांदेड महानगरपालीकेच्या हद्दीतील शेत सर्वे नं.५२ / ए व २३ बी सिटी सर्वे नं १३५४ ज्या मधील प्लॉट नं ७२ वर ४ रुमचे घर आहे. त्यापैकी पश्चिमेकडील भाग ज्यांची लांबी रुंदी दक्षिण उत्तर ५० फुट म्हणजे १५.२४ मीटर व रुंदी पर्व पश्चिम २० फुट म्हणजे ६.१० मीटर आहे. एकूण क्षेत्र फळ ९२.९०३ चौ. मीटर असुन सदरील घराचे मालक श्री. पुरुषोत्तम प्रभाकरराव दिवाळकर रा. कैलास नगर ह. मु. गगन रेसिडन्सी पिसोळी पुणे येथे असून मी मीरकुटे बालाजी गोविंदराव राजेंद्र नगर नांदेड येथील रहीवाशी असुन मी दि. २३-०३-२०२६ रोजी मी सदरील घरांची सौदाचिठ्ठी करुन घेतलेली आहे. सौदाचिठीवर काही रक्कम गुगल पे बयाना म्हणून दिलेले आहे. उर्वरीत रक्कम जाहीर प्रगटण दिलेल्या तारखेपासून १० दिवसाच्या आत कोणाचे काही आक्षेप न आल्या दि. १४/०६/२०२६ पर्यंत खरेदीखत करुन घेण्याचे ठरले आहे. सदरील प्रॉपर्टीवर कोणाचे काही आक्षेप असल्यास कागदपत्रांच्या पुराव्यासह खालील दिलेल्या फोन. नं. वर घरपोच येऊन कागदपत्र पुराव्यासह दाखल करावे. वरील दिलेल्या तारखेच्या आत कोणाचे आक्षेप नाही आल्यास असे ग्रहीत धरून खरेदीखत करुण घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटण घेण्यात येत आहे.

संपर्क
मो. नं. ९८२२००७७३१



गोदावरी मनार चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर संचालित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह शंकरनगर ता. बिलोली, जि. नांदेड

## मोफत प्रवेश देणे चालू आहे

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे मोफत प्रवेश देणे चालू आहे. खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग | ५ टक्के |

नोट - एकूण विद्यार्थी संख्या २०+४= २४
वरील वर्गवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.
तरी गरजू विद्यार्थ्यांनी त्वरित प्रवेश घ्यावा.

अधीक्षक व्यवस्थापक

गोदावरी मनार चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर संचालित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह शंकरनगर ता. बिलोली, जि. नांदेड



## नावात बदल

माझे जुने नाव महमद रियाज महमद इब्राहीम असे असून, बदलून नवीन नाव मोहम्मद रियाज मोहम्मद इब्राहीम असे करण्यात आले असून, वरील दोन्ही नावाची मी एकमेव व्यक्ती आहे. तरी संबंधितांनी यापुढे माझ्या नवीन नावाचा उल्लेख करून माझ्याशी व्यवहार करावा.

संपर्क पत्ता-
निजाम कॉलनी, श्रीनगर, नांदेड
मो. ९८२२६१९०९७



## Change In Name

My Old name is Mohammed Ibrahim Which now I am changing as new name Mohammad Ibrahim Hussainsab. Henceforth my all correspondence will be done as my new Name Place consider the same

Address - Nizam Colony Shri Nagar Nanded Mo. No. 9822619097



## Change In Name

My Old name is Shaikh Mohammed Riyaz Which now I am changing as new name Mohammad Riyaz. Henceforth my all correspondence will be done as my new Name Place consider the same

Address - Nizam Colony Shri Nagar Nanded Mo. No. 9822619097



## Change In Name

My Old name is Najmunnisa Begum Which now I am changing as new name Najma Begum Mohammad Ibrahim. Henceforth my all correspondence will be done as my new Name Place consider the same

Address - Nizam Colony Shri Nagar Nanded Mo. No. 9822619097



## Change In Name

My Old name is Farzana Begum Which now I am changing as new name Farzana Mohammad Riyaz. Henceforth my all correspondence will be done as my new Name Place consider the same

Address - Nizam Colony Shri Nagar Nanded Mo. No. 9822619097



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




### नांदेड परिक्षेत्रातील गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम

## अवैध गुटखा व्यवसायाविरोधात व्यापक तपासणी, ६२२ पानटपऱ्यांचीही झाडाझडती





**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस उप-महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३० जून २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्याप्रमाणे परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे. यात आता पानटपऱ्यांचीही झाडाझडती घेण्यात येत आहे.

या मोहिमेच्या सहाव्या दिवशी गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ३ गुन्हे नोंदवत, या व्यवसायात गुंतलेल्या एकूण ३ आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. या मोहिमेअंतर्गत, परिक्षेत्रातील नांदेड जिल्ह्यात २ तर हिंगोली जिल्ह्यात १ अशा एकूण ३ कारवाया करण्यात आल्या असून, यातील ३ आरोपींकडून १ लाख ८८ हजार ६३० रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात, संबंधिताविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा आहे. त्यास दहा वर्षेपर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

**पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम :** गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची पानटपऱ्यांवरून होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. काल दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात एकूण ६२२ पान टपऱ्यांची तपासणी करण्यात आली असून, गुटख्यासोबतच अंमली पदार्थांच्या साठवणुकीची संभाव्य ठिकाणे देखील तपासण्यात येत आहेत.

**'खबर' हेल्पलाइनला वाढता प्रतिसाद :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, या हेल्पलाईनवरून नागरिक अवैध व्यवसायांची अचूक माहिती पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवत आहेत.

नागरिकांनी आपल्या भागातील गुटखा, अंमली पदार्थ व इतर अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी व आपल्या भागातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## अवैध प्रवासी वाहतूक, अनधिकृत फळगाडे, हातगाडे यांच्याविरुद्ध कारवाईत ३६२ गुन्हे दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील वजिराबाद शहर वाहतूक शाखेच्यावतीने रविवार, दिनांक ७ जून रोजी मोहीम राबवून अवैध प्रवाशी वाहतूक, विनावाहन परवाना चालणारी वाहने, अनधिकृत फळ गाडे, हातगाडे यांच्यावर धडक कारवाई करून ३६२ केसेस केल्या.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या आटोक्यात आणण्यासाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विनापरवाना / परमिट चालणारी वाहने, भरधाव वेगाने चालणारी वाहने, फटाका बुलेट, वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करणारे, रस्त्यावर लागलेले अनधिकृत फळांचे हातगाडे व वाहने, काळे फिल्म, ड्रंक अँड ड्राईव्ह, ट्रिपल सीट यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम राबविण्याच्या शहर वाहतूक शाखेचे नूतन पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांना आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने दि. ६ जून २०२६ रोजी मुंडे व स्टाफ तसेच महानगरपालिका यांचे अतिक्रमणचे उपायुक्त अजितपालसिंग संधू यांनी त्यांचे पथक यांच्यासमवेत जुना मोंढा, देना बँक चौक, महावीर चौक, सोनू कॉर्नर, वजिराबाद चौक, डॉक्टर लाईन कलामंदिर, आय.टी.आय. या ठिकाणी रस्त्यांवरील हातगाडे, फळगाडे, फलक, बोर्ड काढून जप्त करण्यात आले. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर ट्रिपल सिट वाहने, परवाना नसलेले वाहने व इतर यांचेवर कारवाई करुन ३६२ केसेस केल्या. त्यांच्यावर ३ लाख ५३ हजार रूपयाचा दंड आकारण्यात आला.

या मोहिमेमध्ये पोलीस निरीक्षक मुंडे, पोलीस मुख्यालयातील २० अंमलदार व दंगल नियंत्रण पथकाचे एक प्लाटुन तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. वाढत असलेल्या ट्राफीकमुळे लोकांनी त्यांची चार चाकी/दोन चाकी वाहने कुठेही पार्क न करता पार्कीगचे ठिकाणी पार्क करावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या प्रकारे कोणतेही फळ गाडे व इतर असे रस्त्यामध्ये लावून अतिक्रमण करू नये, सिग्नलचे पालन करावे व वाहतुकीस अडथळा होईल अशी कोणतीही कृती करू नये व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा मोटार वाहन कायदा व इतर कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.


**पान १ वरून...**


**पेपरमध्ये वडापाव, समोसे दिल्यास कडक.....** पेपरमध्ये ठेवून मग वर्तमानपत्रात बांधले जातात. हल्ली अनेक ठिकाणी रस्त्यांवरच्या खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर आणि हॉटेलमध्येही इडली, मेदूवडा, मसाला डोसा असे खाद्यपदार्थ सिल्व्हर फॉईल किंवा बटर पेपरमध्ये बांधून दिले जातात.

**गॅसच्या दरात दुसऱ्यांदा वाढ....** घास मात्र दिवसेंदिवस महाग होत चाललाय. सरकार या महागाईच्या राक्षसाला नियंत्रणात आणून नागरिकांना दिलासा देणार की यापुढेही इंधन दरवाढीचा चटका सामान्य जनतेला बसत राहणार ते पाहणं महत्वाचं आहे.

**धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन .....** आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणार, असेही अभिजीत दीपके म्हणाले. आंदोलकांवर होणाऱ्या टीकेचा समाचार घेताना दीपके यांनी संताप व्यक्त केला. वेदांत नावाच्या १७ वर्षांच्या सीबीएसईच्या विद्यार्थ्याने जेव्हा मार्कशीटमधील घोळ उघड केला, तेव्हा त्याला मीडिया आणि सरकारने 'पाकिस्तानी' म्हटले. तुम्ही पत्रकारांना, बेरोजगारांना, प्रश्न विचारणाऱ्यांना पाकिस्तानी म्हणता, मग भारतीय आहे तरी कोण? फक्त भाजप आणि आयटी सेलवालेच भारतीय आहेत का? आम्ही आंदोलने कोणत्या एका पक्षासाठी करत नाही, तर तरुणांच्या मुद्द्यांसाठी करत आहोत.

**सुनेत्रा पवारांच्या रिक्त जागी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून....** या सल्ल्यावर सुनील तटकरे यांनी तीव्र शब्दांत पलटवार केला. आमच्या पक्षात आम्ही उमेदवारी कोणाला द्यावी याबाबत आम्हाला त्यांचा सल्ला घेण्याची पाळी आलेली नाही. त्यांनी त्यांच्या पक्षात पहिले सल्ले द्यावे. त्यांचे संख्याबळ कसे वाढेल यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित करावे, असे सुनील तटकरे म्हणाले.

## शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या राज्याध्यक्षपदी संतोष मलेवार यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या राज्यस्तरीय निवडणुकीत राज्याध्यक्षपदी संतोष मलेवार यांची तर सहसचिवपदी सागर चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे संघटनेत नवे नेतृत्व, नवचैतन्य आणि अधिक सक्षम संघटनात्मक कार्याला बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ही निवडणूक प्रक्रिया तांत्रिक व दूरस्थ पद्धतीने पार पडली. देशातील सध्याच्या परिस्थितीचा विचार करून आणि पंतप्रधानांच्या सूचनेनुसार आधुनिक, सुरक्षित व किफायतशीर पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या ऑनलाईन प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणावर प्रवास टाळता आला, किमान ३ लाख रुपयांपर्यंत पेट्रोल-डिझेलचा खर्च वाचला, वाहतुकीवरील ताण कमी झाला आणि संघटनेच्या निधीचा अनावश्यक खर्च टाळला गेला.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत निवडणूक अधिकारी ॲड. मनीष खरात, सहायक निवडणूक अधिकारी कमलाकर शेटे, सुधाकर टकित तसेच निरीक्षक ह्युमान पठाण आणि इतर मान्यवरांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे, काटेकोर नियोजनामुळे आणि तांत्रिक शिस्तीमुळे ही निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली.

## सात वर्षीय चिमुकल्याचा विद्युत शॉक लागल्याने मृत्यू



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मधील हमीदिया कॉलनी परिसरात महावितरणच्या कथित हलगर्जीपणामुळे एका ७ वर्षीय चिमुकल्याचा विद्युत शॉक लागल्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे नांदेड शहरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या घटनेतील मृत बालकाचे नाव आदिल साजिद खान पठाण (वय ७ वर्षे) असे आहे. आदिलचे वडील साजिद खान पठाण हे मूळचे लोहा तालुक्यातील रहिवासी असून, कामानिमित्त ते कुटुंबासह नांदेड येथील हमीदिया कॉलनीत (मलंग बाबा बिल्डिंगच्या पाठीमागे) भाड्याच्या घरात वास्तव्यास होते. ६ जून रोजी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास आदिल खेळण्यासाठी घरातून बाहेर पडला होता. मात्र, बराच वेळ झाला तरी तो घरी न परतल्याने कुटुंबियांनी त्याची शोधमोहीम सुरू केली. सोशल मीडिया आणि व्हॉट्सॲप ग्रुप्सवरही त्याचे फोटो शेअर करून शोध घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.

रात्री उशिरा या परिसरातून जाणाऱ्या एका वाहनचालकाला वीजेच्या खांबाजवळ एक मुलगा बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसला. त्याने तातडीने स्थानिक नागरिकांना याची माहिती दिली. नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली असता आदिलचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. परिसरात पुरेशा प्रकाशाचा अभाव आणि वीज खांबाला लागलेली तुटलेली सर्व्हिस वायर यामुळे खांबाद्वारे जमिनीत करंट उतरले होते. याच वीज खांबाचा स्पर्श झाल्याने आदिलचा जागीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

काही दिवसांपूर्वीच याच परिसरात एमएसईबीच्या निष्काळजीपणामुळे एका शेळीचा करंट लागून मृत्यू झाला होता. त्यावेळी तरी प्रशासनाने सावध व्हायला हवे होते. मात्र, कोणतीही दुरुस्ती किंवा सुरक्षा उपाययोजना न केल्याने अखेर एका निरागस चिमुकल्याला आपला जीव गमवावा लागला. या प्रकरणी महावितरण व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा विमा दाखल करावा, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.

## आत्मा व कृषी विभागाची खरीप हंगामपूर्व कार्यशाळा संपन्न



**मुदखेड (प्रतिनिधी)** –कृषी विभाग आणि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ जून २०२६ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुदखेड येथे अल निनोच्या पार्श्वभूमीवर 'खरीप हंगाम पूर्व कार्यशाळा व किसान गोष्टी' अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन मेळावा अतिशय उत्साहात संपन्न झाला.

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मुदखेड परिसरातील शेतकरी बांधवांनी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक तथा तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शेतकऱ्यांनी बाजारातून आणलेल्या किंवा स्वतःकडील घरचे बियाणे वापरण्यापूर्वी त्याची घरच्या घरी उगवण क्षमता तपासणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे बियाणे निकृष्ट निघाल्यास होणारे आर्थिक नुकसान आणि दुबार पेरणीचे संकट टाळता येईल. यासोबतच जमिनीची सुपीकता टिकवून उत्पादन खर्च कमी करण्यासाठी रासायनिक खतांचा अनिर्बंध वापर टाळून माती परीक्षणानुसार संतुलित खतांचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## सा. बां. विभागाच्या अभियंत्यास खंडणी मागणारा अटकेत



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यास खंडणी मागणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. त्याने इतर दोन साथीदारांचीही नावे पोलिसांना सांगितली. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या पथकाने रविवार, दि. ७ जून रोजी ही कारवाई केली.

रविवार, दि. ७ जून रोजी धर्माबाद येथील सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता म्हणून कार्यरत असणारे शाखा अभियंता हनुमंत रावसाहेब नरवाडे यांना अज्ञाताने फोनव्दारे पाच हजार रुपयांची खंडणी मागून खंडणी न दिल्यास गोळ्या घालून ठार मारतो, अशी धमकी दिली होती. यावरुन धर्माबाद पोलीस ठाण्यात कलम ३०८ (५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यासंबंधाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सदर आरोपीस तत्काळ अटक करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना आदेशीत केले होते. यावरून भोसले यांनी सपोनि रवी वाहुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना माहिती काढुन सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत सुचना केल्या होत्या. त्यानुसार रविवार, दि. ७ जून रोजी या गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढत असताना तांत्रीक पुराव्या आधारे तसेच गोपनीय माहितीप्रमाणे आरोपी पांडुरंग तोलबा वन्ने रा. वाका ता. लोहा, जि. नांदेड ह.मु. सुनील नगर बळीरामपूर, नांदेड यास ताब्यात घेऊन गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्याने त्याचे साथीदार देवीदास गणेश गायकवाड रा. जवाहरनगर तुप्पा ता. जि. नांदेड, अशोक वाघमारे रा. एकलारा ता. मुखेड जि. नांदेड यांच्यासह संगनमत करुन सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्यातील वापरण्यात आलेला मोबाईल जप्त करण्यात आला. सदर आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाहीस्तव धर्माबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## लोह्याचे भूमिपुत्र सचिन शिंदे यांचे यूपीएससी परीक्षेत यश



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील भूमिपुत्र सचिन विश्वांभरराव शिंदे यांनी यूपीएससी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा लोहा न. प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी लोहा शहराच्या परंपरेनुसार खारिक-खोबऱ्याचा हार घालून सत्कार केला.

सचिन शिंदे हे लोहा येथील नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मॅनेजर विश्वांभरराव शिंदे व श्री संत गाडगे महाराज विद्यालयाच्या सहशिक्षिका सौ. जयश्री विश्वांभरराव शिंदे यांचे ज्येष्ठ पुत्र असून, त्यांचे शालेय शिक्षण १० वीपर्यंत लोहा येथील श्री संत गाडगे महाराज विद्यालयात झाले. तर १२ वीचे शिक्षण लातूर येथील राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयात झाले व पुढे चालून त्यांनी पुणे येथे सीओईपी इंजिनिअरिंग कॉलेज येथे इंजिनिअरिंगची पदवी पूर्ण केली.

सचिन शिंदे हे लहानपणापासूनच अभ्यासात हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जातात. त्यांनी जिद्द, चिकाटी, मेहनत व कठोर परिश्रम घेऊन अभ्यास पूर्ण करून राष्ट्रीय स्तरावरील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले. त्यांची केंद्र सरकारने ईपीएफओ (भविष्य निर्वाह निधी) मध्ये इरिफॉरमेंट ऑफिसर (ईओ/एओ) या पदावर निवड झाली आहे. सचिन विश्वांभरराव शिंदे यांनी यूपीएससी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा लोहा येथील शिक्षक कॉलनी येथील निवासस्थानी लोहा न.प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी लोहा शहराच्या परंपरेनुसार खारिक-खोबऱ्याचा हार देऊन सत्कार केला.

यावेळी नगराध्यक्ष शरद पाटील पवार, नगरपरिषदेचे गट नेते भास्करराव पाटील पवार, नगरसेवक पंकज परिहार, लोहा मोंढा येथील प्रतिष्ठित व्यापारी पंढरीनाथ व्यंकटराव चिंचोरे, सहशिक्षक अरविंद उर्फ गब्बू राठोड, सचिन शिंदे यांच्या मातोश्री सौ. जयश्री विश्वांभरराव शिंदे, वडील विश्वांभरराव मारोतराव शिंदे, भाऊ सुरज विश्वांभरराव शिंदे, वहिनी सौ. कोमल सुरज शिंदे, बहीण डॉ.सुप्रिया विश्वांभरराव शिंदे आर्दीची उपस्थिती होती.

## जबरी चोरीतील फरार आरोपीस 'स्थागुशा'कडून अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –जबरी चोरी प्रकरणात पोलिसांना पाहिजे असलेला फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. ही कारवाई रविवार, दि. ७ जून रोजी करण्यात आली.

रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या सूचनेवरून पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांची टिम नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होती. यावेळी त्यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, नांदेड ग्रामीण ठाण्यात दोन महिन्यांपूर्वीचे शरीराविरुद्धचे दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी शेख महेबुब ऊर्फ गोरु हा जामवाडी वाजेगाव येथे रोडवर थांबलेला आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोउपनि कोरे व त्यांचे पथक जामवाडी रोडवर वाजेगाव येथे जाऊन आरोपी शेख महेबुब ऊर्फ गोरु शेख बाबू (वय २९, रा. ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे वाजेगाव, नांदेड) यास ताब्यात घेऊन गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली. त्याने व त्याचे साथीदार शेख सोहेल ऊर्फ छोटा गुजर रा. वाजेगाव यांनी संगनमत करून फिर्यादीचे मुलास खंजरने मारुन गंभीर जखमी केल्याचे सांगितले. तसेच गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथील गुन्हे अभिलेखाची पाहणी केली असता पो. स्टे. नांदेड ग्रा. येथे गुर.नं. ३१३/२०२६ कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३ (५) भारतीय न्याय संहिता ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये दाखल असून, नमूद आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासून दोन महिन्यांपासून फरार होता, त्याचे विरुद्ध शरीराविरुद्धचे व अग्निशस्त्र संबंधाने गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीस नमूद गुन्ह्याचे तपासकामी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सदरची कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com